दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ५४ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२० डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

## लाडक्या बहिणींसाठी सरकारकडून गुड न्यूज

# अधिवेशन संपल्यानंतर मिळणार योजनेचा डिसेंबरचा हप्ता, फडणवीसांची सभागृहात माहिती

**नागपूर (वृत्तसंस्था)–महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरलेली लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी येणार, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सभागृहात माहिती दिली. अधिवेशन संपल्यानंतर लाडक्या बहिणींना डिसेंबरचे पैसे मिळणार असल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. तसेच निकषात बदल करण्यात आले नसल्याचे ते म्हणाले.जुलै महिन्यात लाडकी बहीण योजनेची सुरुवात झाली. आतापर्यंत या योजनेचे पाच हप्त्याचे पैसे लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. विधानसभा निवडणुकीमुळे नोव्हेंबर महिन्याचे पैसे ऑक्टोबर महिन्यातच देण्यात आले होते. निवडणुकीनंतर डिसेंबरचे पैसे कधी येणार, असा प्रश्न सर्वांना पडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आज सभागृहात माहिती दिली. तसेच खात्यामध्ये १५०० की २१०० किती पैसे जमा होणार? योजनेचे निकष काय असतील? या सर्व प्रश्नांवर देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तरे दिली.**


आम्ही जी आश्वासने दिली आहेत, ती आम्ही पूर्ण करणार आहोत. कुणीही मनात शंका ठेऊ नये. लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याचे फडणवीस म्हणाले. आमची एकही योजना बंद होणार नाही, लाडकी बहीण योजना सुरूच राहणार आहे. अधिवेशन संपल्यानंतर लाडक्या बहिणींना डिसेंबरचे पैसे मिळणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. तसेच या योजनेच्या कोणत्याही निकषात बदल करण्यात आलेले नाहीत. ज्यांनी अर्ज केला त्या सर्वांना आपण पैसे देत आहोत, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी फडणवीस सरकारने एकूण ३५ हजार ७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळात सादर केल्या होत्या. त्यात लाडकी बहीण योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांच्या तरतुदीचा समावेश आहे.

### लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी ही अफवा

**लाडकी बहीण योजनेच्या अर्जाची छाननी करून त्यातील महिलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांच्याकडून केला जात आहे. मात्र, लाडकी बहिण योजनेच्या अर्जाची छाननी करण्याचा कोणताही निर्णय झालेला नसल्याचे आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले.**

### पुढील अर्थसंकल्पापर्यंत मिळत राहणार लाभ

**पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांना २१०० रुपयांचा लाभ देण्याचे महायुतीने कबूल केलेले आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याची घोषणा करणार असल्याचे देखील तटकरे यांनी सांगितले आहे. सध्या ज्या महिलांना लाभ मिळत आहे, तो पुढील अर्थसंकल्पापर्यंत तसाच मिळत राहणार असल्याचे आदिती तटकरे यांनी सांगितले होते.**



# भाजपच्या गुंडगिरी विरोधात लढू,भिडू आणि जिंकू

## वर्षा गायकवाड यांचा हल्लाबोल

**मुंबई (वृत्तसंस्था):** भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते मुंबईतील काँग्रेसच्या कार्यालयात शिरले. यावेळी कार्यकर्त्यांकडून कार्यालयात तोडफोड करण्याचा प्रयत्न झाला. तसेच सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियांका गांधी, वर्षा गायकवाड यांच्या फोटोंवर काळी शाही फेकण्यात आली. पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून जमाव पांगवण्याचा प्रयत्न केला. यावर आता वर्षा गायकवाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे.वर्षा गायकवाड म्हणाल्या, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव ऐकताच का कोणास ठाऊक पण मनुवादी आरएसएस–भाजपाने नेहमी हेच केले हल्ले आणि तोडफोड. अमित शाह ने देशाचे उद्धारक बाबासाहेब आणि आंबेडकरी चळवळीचे अपमान केले आहे. आता त्यांना वाचवण्यासाठी आणि लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजप गुंडगिरीवर आली असल्याचा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला आहे.वर्षा गायकवाड म्हणाल्या, भाजपच्या ५० गुंडांनी आमच्या काँग्रेसच्या कार्यालयावर हल्ला केला. खुर्च्या फेकल्या, पोस्टर्स फाडले, आणि मालमत्तेची तोडफोड केली. ही गुंडशाही नाही तर काय आहे. या भ्याड हल्लाच्या मी तीव्र निषेध करते. पण यांच्या गुंडगिरीला आम्ही भिक घालत नाही. आम्ही काँग्रेसचे बब्बरशेर कार्यकर्ते आहोत. आम्ही लढू, भिडू आणि जिंकू. आम्ही याविरोधात कायदेशीर



कारवाई करणार आहोत.मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा करते की महाराष्ट्र कायद्याचा राज्य आहे की नाही? भाजपच्या या गुंडांवर कठोर कलमांतर्गत कारवाई करावी आणि त्यांना कठोर शिक्षा व्हावी. सत्तेत असले तरी काय? महाराष्ट्र भाजपची गुंडशाही खपवून घेणार नाही, असेही वर्षा गायकवाड म्हणाल्या.दरम्यान, पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून जमाव पांगवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी याविरोधात वेळीच पाऊले उचलत लाठीचार्ज केला. यामुळे भाजयुमोच्या कार्यकर्त्यांना घटनास्थळावरून काढता पाय घेतला. पोलिसांनी या प्रकरणी काही कार्यकर्त्यांनाही ताब्यात घेतले आहे.

# अमित शहांच्या विरोधात वंचित बहुजनचे राज्यभर आंदोलन

## भाजपचे चारित्र्य दिसून आले, प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल

**मुंबई (वृत्तसंस्था):** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बेताल विधान केले होते. त्यांनी केलेल्या या विधानाच्या निषेधार्थ राज्यात अनेक भागांमध्ये वंचित बहुजन आघाडीने आंदोलन केले आहे. मुंबई येथील महानगर पालिकेच्या इमारतीच्या समोर वंचितच्या कार्यकर्त्यांनी जमा होत जोरदार आंदोलन केले. यावेळी वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर देखील उपस्थित होते.

या आंदोलनावेळी प्रकाश आंबेडकर यांनी जमलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तसेच यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी अमित शहा यांच्यावर जोरदार टीका देखील केली आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, अमित शहाला वाचवायला नरेंद्र मोदी धावून आले. आपल्याला माहीत असेल की, या मुंबईत एक रंगा बिल्ला नावाची जोडी होती आणि आताचे हे रंगा बिल्ला एकमेकांना वाचवत आहेत.प्रकाश आंबेडकर म्हणाले, मला पंतप्रधान नरेंद्र मोदींना सांगायचे आहे की, बाबासाहेब आंबेडकरांना असे संबोधल्याने आम्हाला काही फरक पडणार नाही पण तुमचे चारित्र्य समोर येत आहे. पंतप्रधान मोदींनी आपल्या गृहमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा अन्यथा हे आंदोलन सुरूच राहील, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, काँग्रेसने बाबासाहेबांचा पराभव केला असे भाजप सांगते. पंतप्रधान नरेंद्र मोदी मइ तुम्हाला विचारतो की, या मध्य मुंबई मधील १९५२ च्या लोकसभा निवडणुकीत आरएसएस आणि डावे पक्ष एकत्र होते की नाही? हे सांगा. या दोघांनी मिळून मध्य मुंबईमध्ये बाबासाहेबांना निवडणूकीत हरवले आहे. हा इतिहास आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना विरोध करणाऱ्या सर्वांचे मी स्वागत करतो. या विरोधात लाखोंच्या संख्येने बाहेर पडावे, असे आवाहन सर्वांनी केले आहे. आज आम्ही हा संताप मोर्चा शांततेने करत आहोत पण भविष्यात आमचा मोर्चा संतापाने भरलेला असेल, हा आमचा मार्ग आहे. अमित शहा यांनी केलेले विधान हे द्वेषपूर्ण भावनेतून केले असल्याचा आरोप वंचितकडून करण्यात येत आहे. तसेच वंचितचे लातूर शहर अध्यक्ष सचिन गायकवाड यांनी शहा यांनी बिनशर्त माफी मागावी आणि तसे न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.राज्यसभेत संविधानावर झालेल्या चर्चेदरम्यान अमित शहा म्हणाले होते की, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर म्हणण्याची फॅशन झाली आहे. त्यांनी एवढ्या वेळा देवाचे नाव घेतले असते तर त्यांना स्वर्गात स्थान मिळाले असते. शहा यांच्या या वक्तव्यानंतर विरोधी पक्षांचे नेते भाजपवर सातत्याने हल्लाबोल करत आहेत.

# विधान परिषदेच्या सभापतीपदी भाजपचे आ.राम शिंदे:अडीच वर्षांपासून पद होते रिक्त

**नागपूर (वृत्तसंस्था)**: विधान परिषदेच्या सभापती पदी भाजपचे आमादार राम शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. भाजपकडून राम शिंदे यांनी बुधवारी सकाळी विधान परिषद सभापती पदासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, त्यांच्या विरोधात एकही अर्ज दाखल झाला नाही. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या माध्यमातून भाजपने राम शिंदे यांचे पुनवर्सन केल्याचे बोलले जात आहे.

नागपूर येथील विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू असतानाच विधान परिषदेच्या सभापतीची निवड झाली आहे. विधान परिषद सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार याची सर्वांनाच उत्सुकता होती. विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिंदे गटाच्या आमदार निलम गोऱ्हे यांना सभापती पदावर संधी मिळेल, असा विश्वास शिंदे गटाच्या नेत्यांना होता. मात्र, भाजपकडून राम शिंदे यांची विधान परिषद सभापतीपदी वर्णी लावण्यात आली. राम शिंदे हे देवेंद्र फडणवीसांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळे भाजपकडून शिंदे गटाला हा आणखी एक धक्का मानला जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर यांना सभापती पद सोडावे लागल्यानंतर गेली दोन ते अडीच वर्षांपासून विधीमंडळाचे वरिष्ठ सभागृह म्हणून ओळख असलेल्या विधान परिषदेचे सभापती पद रिक्त होते. रामराजे नाईक निंबाळकर यांची विधान परिषदेवर पुन्हा निवड झाली आहे. मात्र, त्यांना पुन्हा संधी मिळू शकलेले नाही. विधान परिषदेच्या सभापती पदाचे काम सध्या परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे पाहत होत्या. त्यामुळे त्यांचीच सभापतीपदी निवड होईल, अशीही अपेक्षा होती.

# नवीन वर्षामध्ये ३५०० लालपरी बसगाड्या येणार एसटीच्या ताफ्यात:मंत्री भरत गोगावले यांची घोषणा

**नागपूर (वृत्तसंस्था)**: २०२५ मध्ये म्हणजे येणाऱ्या नवीन वर्षामध्ये महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला चांगल्या आणि दर्जेदार प्रवासी सेवा देण्याच्या उद्देशाने सुमारे ३५०० नव्या साध्या लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल करण्याची घोषणा एसटीचे अध्यक्ष व मंत्री भरतशेठ गोगावले यांनी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केली.सध्या एसटीकडे बसेसची प्रचंड कमतरता आहे. एसटीच्या ताफ्यामध्ये आता १४ हजार बसेस असून करोना महामारीपूर्वी म्हणजे २०१८ मध्ये एसटी कडे तब्बल १८ हजार बसेस होत्या. परंतु गेल्या ३–४ वर्षात करोना महामारी व इतर काही कारणामुळे एसटीला नव्या बसेस खरेदी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे ताफ्यात असलेल्या अनेक बसेस जुन्या झाल्यामुळे त्या नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच बसेसची कमतरता असल्यामुळे प्रवाशांना अतिरिक्त बस फेऱ्या देणे शक्य होईना. या सगळ्याचा विचार करून एसटीने स्वमालकीच्या २२०० बसेस खरेदी करण्याचा व १३०० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. या सुमारे साडेतीन हजार बसेस जानेवारी महिन्यापासून एसटीच्या ताफ्यात समाविष्ट व्हायला सुरू होईल. त्यामुळे नवीन वर्षामध्ये प्रवाशांना रस्त्यात बस नादुरुस्त होणे, बसेसची तासनतास तास वाट पाहत बसणे अशा तक्रारीला कमी होतील, असे गोगावले यांनी सांगितले.

राज्यातील सर्व बस स्थानकांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याची योजना महामंडळाने आखली असून, काही बस स्थानके ही शासनाच्या निधीतून तर काही बस स्थानके बांधा–वापरा–हस्तांतरीत करा या तत्त्वावर खाजगी विकासकांकडून विकसित केली जाणार आहेत. मागील सरकारच्या काळामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहकाऱ्यांने राज्यभरातील १८३ बसस्थानक परिसराचे काँक्रिटीकरण करण्यास सुरुवात झाली होती. त्याला आता गती प्राप्त झाली असून, नागपूर मधील गणेश पेठ बसस्थानकाचे काँक्रिटीकरण देखील याच टप्प्यात पूर्ण होत आहे. भविष्यात विदर्भातील एक देखणे बस स्थानक म्हणून गणेश पेठ बस स्थानकाचा नावलौकिक होईल, असे गोगवले यांनी सांगितले. यावेळी एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते.



# हदगाव तालुक्यातील घराणेशाहीवर पांडुरंग कदम यांचा तीव्र विरोध

## सामान्य कार्यकर्त्यांना न्यायाची मागणी

**नांदेड | बालाजी पाटिल**

हदगाव तालुक्यातील राजकीय घराणेशाहीवर सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासक पांडुरंग कदम यांनी कडाडून टीका केली आहे. दैनिक सह्याद्रीचा राखणदार शी संवाद साधताना कदम यांनी सांगितले की, हजारो कार्यकर्ते आयुष्यभर मेहनत करतात, परंतु घराणेशाहीमुळे त्यांना राजकीय संधी मिळत नाही. हे लोकशाहीसाठी अन्यायकारक आहे.

कदम यांनी नमूद केले की, नव्या विधानसभेत एकाच कुटुंबातील दोन-दोन सदस्य सभागृहात शेजारी बसणार आहेत, ही परिस्थिती लोकशाहीच्या मुल्यांना छेद देणारी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात विविध समाज घटकांना प्रतिनिधित्व न देता, राजकीय घराण्यांना मक्तेदारी दिली जाते, असे ते म्हणाले.कदम यांनी स्पष्ट केले की, सामान्य कार्यकर्त्यांना घराणेशाहीच्या सावटाखाली राहावे लागते. नेत्यांच्या आधारावर कार्यकर्त्यांचे भविष्य ठरते, त्यामुळे बंडखोरी करण्याची हिंमत होत नाही. यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी मिळणे कठीण बनते.पांडुरंग कदम यांनी हदगाव आणि हिमायतनगर तालुक्यातील सत्ताधारी आमदार बाबुराव पाटील कोहीळीकर यांच्याशी आशा व्यक्त केली आहे की, तालुकाध्यक्ष निवडीत निष्ठावंत आणि तळागाळातील शिवसैनिकांना न्याय मिळावा.



**पांडुरंग कदम यांच्या मते, बाबुराव पाटील कोहीळीकर यांच्या नेतृत्वाखाली तळागाळातील शिवसैनिकांना संधी मिळाली, तर तालुक्यातील विकासाला नवा आयाम मिळेल. घराणेशाहीच्या विरोधात सामान्य कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे, ही काळाची गरज आहे, असे ते ठामपणे म्हणाले.**

जुन्या जाणत्या शिवसैनिकांना नेतृत्वाची संधी दिली जावी, अशी मागणी त्यांनी केली.

# जि.प.शाळेतील 'आठवडे बाजार-खाऊगल्ली' उपक्रमास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड येथे शालेय अभ्यासक्रमाबरोबरच दैनंदिन जीवनातील व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे या उद्देशाने शहरातील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक मुलामुलींच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी किलबिल भाजी बाजार व खाऊगल्लीचे आयोजन केले होते.या उपक्रमाला ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी तालुक्यातील पहिली सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याचा मान शाळेला मिळाला असून संपूर्ण शाळेत विध्यार्थ्यांच्या सुरक्षतेसाठी लोकवर्गणीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्या आहेत. याचे लोकआर्पण यावेळी करण्यात आले.

मुला- मुलीच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सामान्यज्ञान वाढविणे, दैनंदिन व्यवहार, बाजार खरेदी-विक्रीचा व नफा-तोटाचा अनुभव, संवाद कौशल्य, बौद्धिक क्षमता वाढविणे या उद्देशाने शाळेच्या प्रागंणात किलबिल भाजी बाजाराचे आयोजन केले होते. मुलांनी शेतातील विविध पालेभाज्या, फळेभाज्या आणल्या होत्या. विविध खाद्यपदार्थाचे स्टॉल विक्रीसाठी मांडले होते. 'ताजी भाजी, वडापाव स्वस्तात मस्त..' अशी आरोळी देत ग्राहकांना विद्यार्थी आकर्षित करत होते. खरेदीसाठी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थांनी गर्दी केली होती. ग्रामस्थांनी खरेदीबरोबर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. उपक्रमात १०० ते १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हजारोंची उलाढाल झाली.



यावेळी बदलापूर येथील घटनेनंतर शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबर त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आलात्यानंतर जामखेड तालुक्यात प्रथम जिल्हा परिषद मराठी मुलं मुलीच्या शाळेने पुढाकार घेऊन लोकवर्गणीतून शाळेच्या आवारात सात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले. या उपक्रमाचे पालकवर्गातून कौतुक करण्यात आले. मुख्याध्यापक संजय कर्डिले, दत्तात्रेय यादव यांनी नियोजन केले.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नासिर सय्यद, मुलीच्या शाळेचे अध्यक्ष शिवाजी राळेभात, निलेश गायकवाड, संतोष तावरे, निलेश राळेभात, नितीन टेकाळे, सोमैय्या शेख, योगेश येवले, मयूर टेकाळे, पल्लवी पवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

या उपक्रमाचे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव, गटशिक्षणाधिकारी कैलास खैरे, खताळ, विस्ताराधिकारी नरवडे, केंद्रप्रमुख नवनाथ बडे यांनी कौतुक केले. आनंद बाजार यशस्वी होण्यासाठी वंदना मोरे, राधा डीसले, अलका धाउड, कालिंदा म्हेत्रे, कल्पना ससाणे, राणी वराडे, कल्पना साबळे, कल्पना मोरे ,सारिका पोले, रेखा साळे, सरिता कवडे, शिरीष कदम, नितीन मोहळकर आदींनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन सागर माकुडे यांनी केले.

# संगमनेरच्या विकासासाठी आमदार अमोल खताळ यांची मागणी

**राहुरी | प्रतिनिधी**

संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे नूतन आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत महत्त्वपूर्ण मागण्या मांडत आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी दुष्काळग्रस्त भागांसाठी उपसा सिंचन योजना लागू करण्याबरोबरच रस्ते विकासाच्या प्रकल्पांवर भर दिला. राज्यातील मराठी बहुल सीमा भागातील ८६५ गावांमध्ये महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन करत, या योजनेचा अधिकाधिक नागरिकांना फायदा व्हावा यासाठी ग्रामीण भागातील रुग्णालयांचा समावेश करण्याची मागणी खताळ यांनी केली.



मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने ४५० विद्यापीठांमध्ये मराठीचा अभ्यास सुरू होणार आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि राज्यातील महत्त्वाच्या नेत्यांचे आभार मानताना, या योजनेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या संगमनेरच्या ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांचा अभिमान व्यक्त केला. महायुती सरकारच्या चौथ्या महिला धोरणामुळे महिलांच्या कल्याणासाठी घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करत, लाडक्या बहिण योजना यशस्वीपणे राबवून १,३५,१२६ महिलांना लाभ देण्याचा उल्लेख त्यांनी केला. संगमनेर तालुक्यातील पठार भाग, तळेगाव-निमोण भागातील गावांसाठी रस्ते विकासाची मागणी करत, दमणगंगा, वैतरणा, गोदावरी नदीजोड प्रकल्पांत तालुक्यातील गावांचा समावेश करण्याची विनंती केली. तसेच मुळा धरणाच्या बॅक वॉटरमधून उपसा सिंचन योजना राबवण्याची मागणी करून दुष्काळमुक्तीसाठी ठोस प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आमदार अमोल खताळ यांच्या या मागण्या संगमनेर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

# श्रीगुरुदेव सुसंस्कार एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**भद्रावती | प्रतिनिधी**

श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर समिती, भद्रावतीच्या वतीने दिनांक २२ डिसेंबर रोज रविवारला श्री मुर्लीधर पाटील गुंडावार लॉन, भद्रावती येथे एकदिवसीय सुसंस्कार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असुन वर्ग ६ ते वर्ग १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांनाच या कार्यशाळेत सहभागी होता येईल. सकाळी ६.३० वाजता पासुन या कार्यशाळेला सुरुवात होऊन उपासना संस्कार, योग संस्कार, ध्यान संस्कार, साहित्य लेखन संस्कार, आरोग्य संस्कार, स्पर्श संस्कार, अभिनय संस्कार, चित्रकला संस्कार, सुसंवाद संस्कार आदी विषयांतर्गत विविध तज्ज्ञ मंडळीद्वारे विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येईल. सध्याची विस्कळीत दिनचर्या, दुषीत खानपान व त्यामुळे होणारे आजार, मोबाईलचा सैरवापर, भडक -अश्लिल-हीनदृश्याचे प्रसारण, व्यक्तिमत्व शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे असह्य शिक्षण व त्यातून जडणारे मानसिक रोग, ताणतणाव आदीचा सुळसुळाट झाला आहे. अशा परिस्थितीत सुसंस्कारयुक्त सदगुणांनी सहज शिक्षणातुन बाल तरुणांची मने घडुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा योग्य विकास व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत प्रवेश घेण्याकरीता दिनांक २१ डिसेंबर रोज शनिवारला दुपारी २.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत श्री मुर्लीपाटील गुंडावार लॉन येथे विद्यार्थ्यांच्या शालेय ओळखपत्राची झेरॉक्ससह प्रत्यक्षात येऊन नोंदणी करावी लागेल. बाहेरगावातील विद्यार्थ्यांना सुध्दा या कार्यशाळेत सहभागी होता येत असुन त्यांना प्रत्यक्षात मोबाईल वरुन त्यांची नोंदणी करता येईल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर समिती, भद्रावतीच्यावतीने करण्यात आले आहे.

## वैजापूरमध्ये लव्ह जिहादचा प्रकार

# २८ वर्षीय तरुणी पळवून नेल्याचा आरोप



**वैजापूर | अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यात लव्ह जिहादच्या घटना थांबण्याचं नाव घेत नाहीत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात लव्ह जिहादची प्रकरणं चर्चेत असताना वैजापूरमध्ये देखील असाच प्रकार समोर आला आहे.

२८ वर्षीय हिंदू तरुणीला फुलेवाडी, वैजापूर येथील नवीन खान नजीर खान पठाण याने प्रेमाच्या जाळ्यात ओढून पळवून नेल्याचा आरोप आहे. याप्रकरणी तरुणीच्या वडिलांनी वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

११ डिसेंबर रोजी तरुणी बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले. सुरुवातीला तिच्या कुटुंबीयांनी नातेवाईक व मैत्रिणींमध्ये तिचा शोध घेतला, परंतु ती सापडली नाही. अखेर तरुणीच्या वडिलांनी नवीन खान याच्यावर संशय व्यक्त करत तक्रार दाखल केली. तरुणी पदवीधर असून खाजगी संस्थेत नोकरी करत होती. सध्या ती स्पर्धा परीक्षेची तयारी करत होती. दरम्यान, तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून पळवून नेण्यात आल्याचा आरोप आहे.

मंगळवारी रात्री आठच्या सुमारास वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. पोलीस याप्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अशा घटनांनी चिंता व्यक्त होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी स्थानिक स्तरावर होत आहे.

# बिबी येथील आरोग्य शिबीरात १०८ रुग्णांची कॅन्सर व आरोग्य तपासणी

**कोरपना | प्रतिनिधी**

जिल्हा स्मार्ट ग्रामपंचायत, बिबी व आरोग्य उपकेंद्र, बिबी यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी ग्रामपंचायत सभागृहात कॅन्सर व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन पार पडले. शिबीरात १०८ रुग्णांची कॅन्सर व आरोग्य तपासणी करण्यात आली.

टाटा ट्रस्ट चंद्रपूरच्या वतीने गावातील ३० वर्षावरील लोकांचे बी.पी., शुगर, स्तनाचा कॅन्सर, गर्भाशयाचा कॅन्सर, तोंडाचा कॅन्सर यांची तपासणी व उपचार करण्यात आले. शिबिराचे उद्धाटन सरपंच माधुरी टेकाम यांच्या हस्ते पार पडले. यावेळी उपसरपंच आशिष देरकर, डॉ. सुशील चंदनखेडे, आरोग्य सेविका शालूनंदा खोब्रागडे, लिपिका दास, आशा गटप्रवर्तक फरझाना शेख आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेकरिता आशा कार्यकर्ती सखू खोके, विजया मिलमीले, सुवर्णा उपलेटी, कल्पना ठाकरे, सुवर्णा लोडे, लता गेडाम, सुमन गेडाम, ज्योती काटे, प्रतिभा मुळे, चैताली नरसपुरे, बबीता कांबळे तसेच टाटा ट्रस्टच्या सर्व डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# भद्रावतीचा नियोजित रोटरी उत्सव मेला स्थगित

**भद्रावती | प्रतिनिधी**

भद्रावती येथे होणारा नियोजित रोटरी उत्सव मेला काही तांत्रिक कारणास्तव स्थगित करण्यात आला आहे. रोटरी उत्सव मेल्याची पुढील तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल असे उत्सव समितीचे अध्यक्ष अनिल धानोरकर यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले.भद्रावती येथे रोटरी क्लब भद्रावती तर्फे घेण्यात येणारा नियोजित रोटरी उत्सव मेला दिनांक २० ते २५ डिसेंबरला आयोजित करण्यात आला होता. पण काही तांत्रिक अडचणींमुळे या तारखेला होणारा नियोजित रोटरी उत्सव मेला पुढे ढकलण्यात आलेला आहे. पुढे घेणाऱ्या रोटरी उत्सव मेल्याची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले. या नियोजित मेळाव्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या संदर्भात घेण्यात आलेले ऑडिशन हे कायम राहून, पुढे होणाऱ्या रोटरी उत्सव मेल्यात त्या समस्त स्पर्धकांना संधी मिळणार आहे. या पत्रकार परिषदेत अध्यक्ष किशोर खंडाळकर, चेअरमन अनिल धानोरकर, सुनील पोटदुखे, सुधीर पारधी, डॉ ज्ञानेश हटवार, तथा रोटरीचे सदस्य उपस्थित होते.

# आम्ही शब्द पूर्ण केला आता आमदार काळे यांनीही योग्य भूमिका घ्यावी-शिवाजी लहारे

**कोपरगाव | प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस इतर कारखान्यांनी नेऊ नये याबद्दल आम्ही अनेकदा आवाहन केले आहे. आमचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.नूतन आमदार आशुतोष काळे यांना देखील आम्ही विनंती केली होती. गणेश कार्यक्षेत्रातील ऊस आपल्या कारखान्याने नेऊ नये आम्ही आपल्याला चांगले मताधिक्य देऊ तो शब्द आम्ही पूर्ण केला त्याची जाणीव ठेवत आता आमदार काळे देखील योग्य भूमिका घेतील अशी अपेक्षा असल्याची प्रतिक्रिया श्री गणेश कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन शिवाजीतात्या लहारे यांनी दिली आहे.

गणेश कारखाना परिसरातील ऊस कार्यक्षेत्रात इतर कारखाने टोळ्या टाकतात त्यामुळे गाळपाला अडचण येते. आवश्यक तेवढा ऊस आधीच उपलब्ध नसताना त्यात उसाची पळवा पळवी झाली तर हजारो कुटुंबाची कामधेनु असणारा श्री गणेश सहकारी साखर कारखाना हा अडचणीत येऊ नये यासाठी सर्वांचे सहकार्य गरजेचे आहे. कारखान्याचे मार्गदर्शक विवेक कोल्हे यांच्या सूचनेवरून आम्ही आमदार काळे यांना निवडणुकीत मतरुपी सहकार्य केले आता त्यांनी ऊस घेऊन न जाण्याचे सहकार्य करावे अशी गणेश परिसराची भावना आहे. उसाची उपलब्धता करण्यासाठी दूरवरून वाहतूक करून उस आणणे हे कारखान्याच्या हिताचे नाही. कार्यक्षेत्रातील ऊस गणेशला मिळाला तर गाळप चांगले होऊन कारखान्याच्या विकासाला हातभार लागू शकतो. प्रत्यक्षात सहकारातील अलिखित संकेत आहे की एकमेकांच्या कार्यक्षेत्रात कुठलाही कारखाना टोळ्या टाकत नाही मात्र यापूर्वीचे अनुभव कटू आहे. विधानसभा निवडणूक काळात गणेश परिसराने सभोवताली असणाऱ्या सर्व कारखान्यांना विनंती केली होती की यंदाच्या हंगामात गणेशचा ऊस गणेशला राहील यासाठी आपण नियोजन करावे त्यानंतर मतदानातूनही सहकार्य केले आहे आता लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे त्यांनी योग्य भूमिका घ्यावी अशी प्रतिक्रिया लहारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



**"काळे कारखान्याने गणेश कार्यक्षेत्रात ऊस नेण्यासाठी टाळावे,गणेश परिसराने विधानसभा निवडणुकीत सहकार्य केले आता आमदार आशुतोष काळे यांनी तशी पावले टाकावी अशी गणेश परिसराची भावना.**

# पुयारदंड येथे श्री दत्त जयंतीनिमित्त भव्य पालखी शोभायात्रा संपन्न



**चिमुर । प्रतिनिधी**


चिमुर तालुक्यातील पुयारदंड येथील श्री दत्त जयंती महोत्सव अत्यंत उत्साहात संपन्न झाला. दिनांक १८ डिसेंबर रोजी, श्री दत्त जयंतीनिमित्त भव्य पालखी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. यावेळी भजन मंडळीसह असंख्य महिला, पुरुष आणि बालगोपालांनी उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक पद्धतीने सजवलेली श्री दत्त पालखी पुयारदंडच्या रस्त्यावरून हर्षोल्हासात काढण्यात आली.

पालखी शोभायात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी पूजनाची पूजा आणि फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. श्री दत्त जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले, ज्यात श्री दत्त जन्मसोहळा, महाआरती, काल्याचे कीर्तन, गोपाळकाला आणि दहीहंडीचा उत्सव प्रमुख होते. कार्यक्रमाच्या अखेरीस महाप्रसादाचे वितरण करण्यात आले, ज्यामध्ये हजारो भाविकांनी भाग घेतला.

या उत्सवाच्या यशस्वीतेसाठी श्री दत्त भक्त, उपासक आणि भाविकांनी एकत्र येऊन महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

# पीएम विश्वकर्मा प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप सोहळा संपन्न

## विश्वकर्मा योजनेचा लाभ सर्वांनी घ्यावा–सारिका क्षीरसागर






**बीड । प्रतिनिधी**

जन शिक्षण संस्था अंतर्गत पीएम विश्वकर्मा प्रशिक्षण केंद्र येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाने आयोजित केलेल्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण कल्पतरू प्रतिष्ठानच्या सचिव सारिका क्षीरसागर होत्या.

सारिका क्षीरसागर यांनी पीएम विश्वकर्मा योजनेची माहिती सुस्पष्टपणे सांगितली आणि स्वावलंबी होण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे महत्त्व यावेळी उपस्थितांना सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील १८ पगड जातींसाठी हाती घेतलेल्या या मोहिमेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आव्हान त्यांनी केले.

या सोहळ्यात सर्व लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात जन शिक्षण संस्थेचे संचालक गंगाधर देशमुख, लोकप्रभा चे उपसंपादक नितीन क्षीरसागर, कार्यक्रम अधिकारी सीमा मनुरकर, सुदाम पालकर, महाराष्ट्र नाभिक महामंडळ जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे, शिवाजी सरडे, संतोष बहिरे ठोंबरे, अक्षय जाधव, आकाश सपकाळ आणि अन्य लाभार्थी उपस्थित होते.

# सोलापूर बाजार समितीत कांद्याचे भाव गडगडल–शेतकरी चिंतेत

## सरासरी भाव १८०० रुपयांवर,शेतकऱ्यांची चिंता वाढली

**मोहोळ । प्रतिनिधी**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या भावात मोठी घसरण दिसून आली आहे. दहा ते पंधरा दिवसांपूर्वी कांद्याचे सरासरी दर साडेतीन हजार रुपयांवर होते, तर उच्चांकी दर सात हजार रुपयांपर्यंत होते. मात्र, सध्या कांद्याची आवक तेवढीच असतानाही कांद्याचे दर तब्बल दोन हजार रुपयांनी घसरले आहेत. बुधवारी कांद्याला सरासरी १८०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.



सोलापूर बाजार समितीत बुधवारी ४३० गाड्यांची आवक झाली. ४३ हजार ७७ क्विंटल कांद्यापैकी अवघा पाच क्विंटल कांदा चार हजार सहाशे रुपये प्रति क्विंटल दराने विकला गेला, तर उर्वरित ४३ हजार ६८ क्विंटल कांद्याला सरासरी १८०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.

दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाळ्यात जागेवरच खराब झालेला कांदा काढून शेतकऱ्यांनी नवीन कांद्याची लागवड केली होती. तेव्हा, चार पैसे हाती पडतील, नुकसान भरून निघेल, अशी आशा असताना कांद्याचे अचानक कमी झालेले दर शेतकऱ्यांसाठी अडचणीचे ठरले आहेत. यंदा गतवर्षीपेक्षा कांद्याची आवक कमी आहे, तरीही शेतकऱ्यांना समाधानकारक भाव मिळत नाहीयेत, अशी खंत शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

# महसूली गावातील बोगस पिकवीमा प्रकरणी कायदेशीर कारवाईची मागणी: किसान सभा परभणी

**तालुका । गंगाखेड**

परभणी जिल्ह्यातील १७ बगर महसूली गावात आय सी आय सी आय लोंबार्ड पिकवीमा कंपनीच्या बोगस पिकवीमा प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी किसान सभेने केली आहे. या प्रकरणात शेतकऱ्यांचे ११,९८६ विमा फॉर्म आय सी आय सी आय लोंबार्ड पिकवीमा कंपनीकडे नोंदणी कृत करण्यात आले होते, ज्याचा एकूण २६ लाख ५२६ हेक्टरचा विमा उतरवला गेला आहे.



संशय व्यक्त केला जात आहे की, या विमा प्रक्रियेत फर्जी सातबारा तयार केले गेले असून, परळी शहरातील तीन उड्ड सेंटरवरून विमा उतरवला गेला आहे. या प्रकरणात विमा कंपनी व संबंधित लोकांकडून शेतकऱ्यांचा हिस्सा, राज्याचा हिस्सा आणि केंद्राचा हिस्सा मिळवून ४३ कोटी ६६ लाख रुपये शासनाची फसवणूक केली गेली आहे. हे आकडेवारी परभणी जिल्ह्याची असली तरी महाराष्ट्रात अजून ३५ जिल्ह्यांमध्ये ही प्रकरणे असू शकतात.

यावरून महाराष्ट्र कृषी मंत्रालयाकडून काय कारवाई केली जात आहे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. किसान सभेने जिल्हा कृषी विभाग तसेच सचिव जिल्हा स्तरीय पिकवीमा सुकाणू समिती परभणी यांच्याकडून अहवाल मागवून आय सी आय सी आय लोंबार्ड पिकवीमा कंपनी तसेच संबंधित लोकांवर फौजदारी कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

कार्यक्रमाच्या वेळी कॉ. राजन क्षीरसागर, कॉ. ओंकार पवार, कॉ. शिवाजी कदम, श्री. सुरेश इखे यांची उपस्थिती होती.

# मोहिते पाटलांच्या अडचणीत पुन्हा वाढ

## भाजप पक्ष आणि सहकार विभागाची नोटीस

**माळशिरस । प्रतिनिधी**

भाजपचे विधानपरिषदेचे आमदार रणजीतसिंह मोहिते पाटलांच्या अडचणींमध्ये एकापाठोपाठ एक वाढ झाली आहे. पक्षाकडून त्यांच्याविरुद्ध कारवाईला सुरुवात झाल्यानंतर आता सहकार विभागाने देखील मोहिते पाटलांवर कारवाई करण्याचे ठरवले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेत त्यांच्या कारवाईवर ठपका ठेवला असल्यामुळे शंकर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदावरून त्यांना अपात्र ठरवण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.



रणजीतसिंह मोहिते पाटील हे शंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. या कारखान्याला भाजप सरकारने मोठे आर्थिक पॅकेज दिले असून, त्यांच्या विरोधात पक्षातून तक्रारीनंतर दोन दिवसांपूर्वी त्यांना पक्षातून निलंबित का करावे याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

आता, सहकार विभागाने देखील त्यांना १६ जानेवारी पर्यंत शंकर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदावरून अपात्र ठरवू नये अशा कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. याच दरम्यान, जर रणजीतसिंह मोहिते पाटलांनी आपली बाजू न सादर केली, तर त्यांचे संचालक पद रद्द होईल. यामुळे, आमदार मोहिते पाटलांच्या अडचणींमध्ये अधिकच वाढ होण्याची शक्यता आह

# अभ्यासकेंद्र कार्यशाळा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित

**नागपूर । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत येणाऱ्या विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने केंद्र प्रमुख, केंद्र संयोजक आणि तांत्रिक सहाय्यक यांच्या मार्गदर्शनासाठी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी धरमपेठ विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित सर्व अभ्यासकेंद्राची कार्यशाळा प्रशासकीय कारणास्तव पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आलेली आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी. कार्यशाळेची पुढील तारीख आणि ठिकाण यथावकाश कळविण्यात येईल अशी माहिती एका पत्रकाद्वारे विभागीय केंद्र नागपूर यांनी दिली.

# चिखलीचा रोहन माने २०० मीटर धावणेत मोहोळ तालुक्यात प्रथम

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील श्री दत्त प्रशाला, मोहोळ स्टेशन येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक क्रीडा प्रकारात २०० मीटर धावण्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिखली (ता. मोहोळ) चा विद्यार्थी रोहन सिध्देश्वर माने याने उत्कृष्ट यश मिळवित तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.

त्याच्या या यशाबद्दल त्याचा गटशिक्षणाधिकारी अविचल महाडीक, शिक्षणविस्तार अधिकारी बंडू शिंदे, मल्लिनाथ स्वामी यांनी त्याला प्रशस्तीपत्रक व मेडल देऊन सत्कार केला. यावेळी रोहन मानेला राजेंद्र बनसोडे, विनोद बंडगर, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका यांच्या मार्गदर्शनाचे मोठे योगदान लाभले. रोहन माने व मार्गदर्शक शिक्षकांना निवृत्त केंद्रप्रमुख श्रीकांत खताळ, मुख्याध्यापक विष्णू दाढे, शाळा व्यवस्थापनाच्या अध्यक्ष चंद्रकला सिरसट, उपाध्यक्ष श्रीनिवास यादव तसेच ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले



# बदलापुरातील चिमुकल्यांच्या न्यायासाठी लढणारा आंदोलनकर्ता अद्याप तुरुगात;वकिलांचे सहकार्याचे आवाहन

**बदलापूर । प्रतिनिधी**

बदलापुरात काही महिन्यांपूर्वी दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ उभारलेल्या आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या एका आंदोलनकर्त्याची अद्याप तुरुंगातून सुटका झालेली नाही. श्रीपाद श्रीकृष्ण तेंडुलकर असे या आंदोलनकर्त्याचे नाव असून, इतर सर्व आंदोलकांना जामीन मिळाला असताना, आधार कार्डसारख्या तांत्रिक अडचणीमुळे तेंडुलकर तुरुंगातच आहेत. या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी वकील स्वतः पुढाकार घेत आहेत. त्याला सोडवण्यासाठी आम्ही स्वतः आर्थिक मदत करण्यास तयार आहोत, असे वकिलांनी सांगितले. यासाठी त्यांनी तेंडुलकर यांच्या नातेवाईकांसह बदलापूरकरांनी पुढे येण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने शरद पवार यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'कर्तुत्वाचा सन्मान' या कार्यक्रमातही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. बदलापूरकरांनी चिमुकल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उभारलेल्या या आंदोलनातील सहभागाचा गौरव केला जात आहे. आंदोलनातील योगदानाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनाही सन्मानित करण्यात आले.





# अनगर जि.प.केंद्र शाळेतील अरुंधती गुंड धावण्याच्या स्पर्धेत तालुक्यात पहिली

**मोहोळ । प्रतिनिधी**

श्री दत्त प्रशाला, मोहोळ रेल्वे स्टेशन येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धेत अनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील विद्यार्थिनी अरुंधती राजकुमार गुंड हिने १०० व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी अविचल महाडीक यांनी अरुंधतीला प्रशस्तीपत्रक व मेडल देऊन सन्मानीत केले. अरुंधतीला वर्गशिक्षिका पल्लवी राजमाने, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका तसेच शिक्षणविस्तार अधिकारी बंडू शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

अरुंधतीच्या या यशाबद्दल सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील, लोकनेते साखर कारखान्याचे अध्यक्ष विक्रांत पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आकाश भडकवाड तसेच ग्रामस्थ व पालकांनी तिचे अभिनंदन केले आहे.




# श्री साईबाबा स्थापना दिन उत्सव भद्रावतीमध्ये 'तुच सुखकर्ता तुच दुखहर्ता' नाटकाचे उद्घाटन

**भद्रावती । प्रतिनिधी**

श्री साईबाबा स्थापना दिन उत्सवाच्या निमित्ताने 'तुच सुखकर्ता तुच दुखहर्ता' या नाटकाचे उद्घाटन दिमाखात करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी मास्टर मयंक दर्वे यांच्या हस्ते झाले. या वेळी नाटकाचे लेखक व दिग्दर्शक शालिकदा उर्फ शालिक दानव, सह दिग्दर्शक क्षितीज शिवरकर आणि उत्कृष्ट संचालन करणारे विवेक महाकाळकर देखील उपस्थित होते.

मास्टर मयंक दर्वे यांनी प्रमुख अतिथी म्हणून आपल्या भाषणात नाटकाचे महत्त्व आणि त्यातील संदेश यावर भाष्य केले. या नाटकात जीवनाचे तत्त्वज्ञान आहे, जे श्री साईबाबांच्या शिकवणीशी संबंधित आहे. हे नाटक प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देईल, असे ते म्हणाले. नाटकाचे लेखक व दिग्दर्शक शालिक दानव यांनी नाटकाच्या निर्मितीच्या प्रक्रियेबद्दल आणि त्याच्या उद्देशाबद्दल सखोल माहिती दिली. सह दिग्दर्शक क्षितीज शिवरकर यांनी देखील या नाटकाच्या दिग्दर्शनाची महत्त्वपूर्ण भूमिका आणि त्यात केलेल्या कठोर परिश्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात विवेक महाकाळकर यांनी देखावे प्रभावीपणे सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 'तुच सुखकर्ता तुच दुखहर्ता' हे नाटक एक सशक्त संदेश देणारे असून, ते श्री साईबाबा यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे.



# आदर्श विद्यालयात पारितोषिक वितरण व प्रेरणा विमोचन सोहळा संपन्न

**पुलगाव । प्रतिनिधी**




स्थानिक हरिराम भूत आदर्श विद्यालयात संस्थापक अध्यक्ष स्व. देवकरणजी भूत यांच्या स्मृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्मृती सप्ताहाच्या अंतर्गत दिनांक १४ ते १७ डिसेंबर २०२४ दरम्यान आरोग्य तपासणी शिबिर, क्रीडा संमेलन, शालेय स्नेह संमेलन तसेच प्रेरणा वार्षिकांक विमोचन आणि पारितोषिक वितरण सोहळा साजरा करण्यात आला.

आदर्श शिक्षण प्रचार सभेचे संस्थापक अध्यक्ष स्व. देवकरणजी भूत यांच्या स्मृतीदिनी १७ डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वार्षिक अंकाचे विमोचन करण्यात आले. त्याचसोबत शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला गेला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवलकुमार भूत उपस्थित होते. प्रेरणा वार्षिकांकाचे विमोचन श्रीमती प्राजक्ता राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर अमरावतीचे ज्येष्ठ समाजसेवक गोविंदजी कासट, शाळेचे प्राचार्य संजय दुबे, आणि पर्यवेक्षक हितेंद्र ढोणे उपस्थित होते.

श्रीमती प्राजक्ता राऊत यांनी वार्षिक अंकाचे विमोचन करताना विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच विविध कलागुणांच्या महत्त्वावर मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करताना सांगितले, शिक्षणासोबतच आपल्या अंगी असलेल्या कलागुणांची ओळख असणे महत्त्वाचे आहे. मोबाईलच्या नादी लागून आयुष्याची नासमझी न करता वाचनात मन रमवावे. आई वडील आणि शिक्षकांचा आदर करून त्यांचे मार्गदर्शन स्वीकारले, तर आयुष्य निश्चितच सोन्याहून पिवळे होईल. असे सांगून त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा घेण्याचेही ठरवले.

यानंतर पारितोषिक वितरण सोहळा पार पडला, ज्यामध्ये माध्यमिक शालांत परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यता मिळाली. कु. अनुराधा मस्कर आणि श्रिजय चाफले यांना अनेक पारितोषिके प्रदान केली गेली. तसेच कनिष्ठ महाविद्यालय विभागातील पायल डाहे हिला सुवर्ण पदक बहाल करण्यात आले. संस्थाध्यक्ष नवलकुमार भूत यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक भाषणात प्राचार्य संजय दुबे यांनी उपस्थितांना स्वागत केले. अतिथींचा परिचय प्रा. गणेश हटवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. राजेश लाखे आणि प्रशांत झिलपे यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती माधुरी टाक यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्ग्याच्या नूतनीकरणाच्या कामात भीषण अपघात, एकाचा मृत्यू, अन्य तीन जखमी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



बुधवारी १८ डिसेंबर रोजी दुपारी अडीच वाजता घारगाव तालुक्यातील एका दर्ग्याच्या नूतनीकरणाच्या कामात भीषण अपघात झाला. या अपघातात एक कामगार मृत्यूमुखी पडला, तर अन्य तीन गंभीर जखमी झाले. मृतकाचे नाव सुभाष तुकाराम नरवड (वय २२) असून, गंभीर जखमी अनिल गोयल तिरवडल (वय २५) याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. याशिवाय, अमोल व्यंकटी चुडामन (वय १८) आणि बालाजी मारुती गुलवड (वय ३०) हे दोघेही जखमी झाले आहेत. सर्व कामगार नांदेड जिल्ह्यातील रहिवासी आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्ग्याचे नूतनीकरणाचे कॉन्ट्रॅक्ट ठेकेदार प्रकाश धुळगंड यांनी घेतले होते. मात्र काही कारणास्तव त्यांचा संपर्क पोलिसांना होऊ शकला नाही. गंभीर जखमी कामगारांना डॉ. प्रदीप कुटे यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र सुभाष तुकाराम नरवडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अनिल गोयल तिरवडल यांची प्रकृती चिंताजनक असून, त्याच्या त्वरित उपचाराची आवश्यकता आहे.

घटनास्थळी घारगाव पोलिसांनी पंचनामा केला असून, या घटनेबाबत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल केला नव्हता. पोलिस निरीक्षक भदाणे यांनी याप्रकरणी दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असे सांगितले.

घटनास्थळी उपचार करणारे डॉ. प्रदीप कुटे आणि डॉ. सोनाली कुटे यांच्या टीमने जखमींवर त्वरित उपचार सुरु केले आहेत. ठेकेदार प्रकाश धुळगंड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र तो होऊ शकला नाही. यापूर्वी, या दर्ग्याचे बांधकाम दोन वेळा कोसळले होते, अशी माहिती आहे.

उद्योजक बाबासाहेब कुटे यांनी सांगितले की, घुमटाला कळस बसवण्याचे काम तंत्रदृष्ट्या कठीण नव्हते, त्यामुळे स्लॅब कोसळला असावा असा त्यांचा अंदाज आहे. प्रारंभिक पातळीवर ग्रामस्थांनी काम पूर्ण करण्यास सांगितले होते. ग्रामस्थांनी १७ लाख रुपये बांधकामासाठी दिले होते, तर ६० लाख रुपये वैयक्तिक खर्च करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. मात्र, राजकारणामुळे हे काम पूर्ण करता आले नाही, अशी खंत कुटे यांनी व्यक्त केली.

# उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्ह्यात जागरूकता कार्यक्रम


**पारनेर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यात उद्योगांना चालना देण्यासाठी तसेच नव उद्योजक घडविण्यासाठी जिल्हयात तालुकानिहाय जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. खासदार नीलेश लंके यांनी सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्री जतीन राम मांझी यांची बुधवारी भेट घेतल्यानंतर हा कार्यक्रम घेण्याचे मंत्री मांझी यांनी मान्य केले.

जिल्ह्यात नव्या उद्योगांना चालना, नवउद्योजक घडविण्यासाठी, त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे या हेतूने खा. नीलेश लंके यांनी मंत्री मांझी यांची भेट घेउन चर्चा केली. नगर जिल्हयात नवे उद्योग उभारणीसाठी मोठी संधी असून सुपा-पारनेर ही औद्योगिक वसाहत झपाटयाने विकसीत होत आहे. या वसाहतीमध्ये अनेक परदेशी कंपन्यांनी आपले उद्योग सुरू केले असून राज्यातील मोठया औद्योगिक वसाहतीकडे या वसाहतीची वाटचाल सुरू आहे. या वसाहतीसह जिल्ह्यातील उद्योजकांना उद्योग सुरू करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने खा. लंके यांनी पुढाकार घेत मंत्री मांझी यांची भेट घेत सविस्तर माहीती दिली. खा. लंके यांनी दिलेल्या माहीतीवर प्रभावीत होत मंत्री मांझी यांनी नगर जिल्हयात जागरूकता कार्यक्रम घेण्यास मान्यता दिली. नगर जिल्ह्यातील उद्योगाची रूपरेषा ठरविण्यासंदर्भात तसेच सुक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयांतर्गत असणा-या योजना लवकरच प्रथम प्रत्येक तालुक्यात व त्यानंतर जिल्ह्याच्या ठिकाणी जागरूकता कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

## आर्थिक सहाय्यासाठी मार्गदर्शन

**सुक्ष्म, लघु व मध्यम मंत्रालयाअंतर्गत उद्योजक वाढीसाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यात येईल व तात्काळ उदयम आधार रजिष्ट्रेशन असलेल्या उद्योजकांना आर्थिक सहायय देण्याकरीता योग्य ते मार्गदर्शन करण्यात येणार आहे.**



# पै.नाना डोंगरे यांना महात्मा ज्योतीबा फुले फेलोशिप नॅशनल अवॉर्ड

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**




सामाजिक कार्यात उत्कृष्ट योगदानासाठी सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना दिल्लीतील भारतीय दलित साहित्य अकादमीने महात्मा ज्योतीबा फुले फेलोशिप नॅशनल अवॉर्ड प्रदान केला. या अभिमानास्पद पुरस्कारानंतर त्यांचा निमगाव वाघा तालुका नगर येथे सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभात बिरोबा देवस्थानचे भगत नामदेव भुसारे, अहमदनगर शोतोकान कराटे डू असोसिएशनचे मुख्य प्रशिक्षक सुरेश जाधव व मयुर काळे यांनी पै. डोंगरे यांचा सत्कार केला. यावेळी सुरेश जाधव यांनी डोंगरे यांच्या निस्वार्थ सामाजिक कार्याची प्रशंसा केली आणि गाव पातळीवर खेळाडू घडविण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, डोंगरे यांच्या कार्यामुळे गावचे नाव उंचावले असून, त्यांच्या पुरस्काराने गावाच्या शानात भर पडली आहे.

सत्काराला उत्तर देताना पै. नाना डोंगरे यांनी सांगितले की, त्यांच्या सामाजिक कार्यामागे गावातील लोकांचा सहकार्य आहे. त्यांना मिळालेल्या कौतुकामुळे आणखी काम करण्याची प्रेरणा मिळत आहे. त्यांनी सांगितले की, गावातील राजकारण बाजूला ठेवून केवळ समाजकारण हेच माझे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच, लवकरच गावातील सामान्य खेळाडूंसाठी कुस्ती संकुल उभारण्याचा त्यांचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# वांबोरी चारीतून शेतकऱ्यांसाठी पाणीपुरवठ्याचा प्रारंभ आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते कार्यक्रम संपन्न

**राहुरी । प्रतिनिधी**



मुळानगर येथे आज वांबोरी चारी लाभार्थी शेतकऱ्यांसाठी पाणी सोडण्याचा महत्वपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला राहुरी नगर पाथर्डी मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. यावेळी राहुरी तालुक्याचे ज्येष्ठ नेते सुभाषराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये बाळूमामा बनकर, संभाजीराव पालवे, तानाजी धसाळ, भाऊसाहेब बोटे, सुरसिंग पवार, सुरेश बनकर, रबाजी सुळ, एकनाथ आटकर, रवींद्र म्हसे, दीपक कारले, संतोष म्हस्के, रवींद्र भापसे, नारायण आव्हाड, धनंजय गाडे, अमोल भानगडे, हरिभाऊ कर्डिले, दत्ता तापकिरे, संजय गिरवले, मधुकर मगर, सुभाष निमसे, बाळासाहेब घोरपडे, भाऊसाहेब ठोंबे, शिवाजी साठे, देवेंद्र लांबे, आर आर तनपुरे, अशोक दातोंडे, बजाबापू घोरपडे, अशोक गुंडे, कैलास पवार, सुभाष गायकवाड, वैभव खलाटे, हनुमंत घोरपडे, सोमनाथ आहेरे, महेंद्र तांबे, बंडू पाठक, शिवाजी सागर, प्रभाकर हरिचंद्रे, मयूर गवळी या मान्यवरांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित सर्व शेतकऱ्यांमध्ये अत्यंत उत्साही वातावरण होते. पाणी सोडण्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची सोय होणार असून त्यांची शेतीला उत्तम गती मिळेल, अशी आशा व्यक्त करण्यात आली. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी या महत्वाच्या कदमाचे स्वागत केले आणि आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आभार मानले.

## सुधीर मुनगंटीवारांच्या मंत्रिमंडळातून वगळण्यात आल्यानंतर

# भाजपमध्ये राजीनाम्याची लाट चेतनसिंह गौर यांचा राजीनामा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सुधीर मुनगंटीवारांना मंत्रिमंडळातून वगळण्याच्या भाजपच्या निर्णयानंतर राज्यभरातून नाराजी व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर गोंडपिपरीचे नगरसेवक आणि भाजपचे गटनेते चेतनसिंह गौर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचा पत्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवला आहे.

राजीनामा पत्रात चेतनसिंह गौर म्हणतात, सुधीर मुनगंटीवार हे सातव्या वेळेस आमदार म्हणून निवडून आले. यावेळी जिल्ह्यातून सर्वाधिक मताधिक्याने निवडून येण्याचा मान त्यांनी पटकावला. सोबतच विदर्भातून सलग सातव्या वेळेस निवडून येण्याचाही विक्रम त्यांनी आपल्या नावे केला. त्यांनी राज्याचे अर्थमंत्री, प्रदेशाध्यक्ष, वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री या महत्वपूर्ण खात्यांमध्ये उल्लेखनीय काम केले. यामुळे त्यांना जनमानसामध्ये लोकप्रियता मिळवून दिली.सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने भाजपच्या या निर्णयावर गौर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गौर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे, लोकनेते, विकासपुरूष आणि चंद्रपूर जिल्ह्याचे तारणहार असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात स्थान न देणे अत्यंत धक्कादायक आहे. भाजपच्या निर्णयामुळे आमच्यासारख्या हजारो तरुणांना नवी दिशा देण्याचं काम करणाऱ्या मुनगंटीवार साहेबांना डावलले आहे. भारतीय जनता पक्ष काय आहे, हे आम्हाला शिकवले आणि एक झुंझार नेतृत्व म्हणून त्यांचं मार्गदर्शन आम्हाला नेहमी मिळालं. शपथविधीच्या दिवशी सुधीर मुनगंटीवार यांचे नाव यादीत असतानाही, शेवटी ते मंत्रिमंडळात घेतले गेले नाही, हे आमच्यासाठी धक्कादायक आहे. या घटनेने आमच्या मनामध्ये असलेली नाराजी आणखी वाढली आहे. मुनगंटीवार साहेबांच्या डावलण्यामुळे भाजपमध्ये काम करण्याची इच्छा राहिलेली नाही, असे गौर यांनी आपल्या राजीनाम्यात स्पष्ट केले आहे.चंद्रपूर जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यभरात भाजपच्या या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया उमठत आहेत. भाजपच्या या निर्णयामुळे मुनगंटीवार यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर दोन ट्रकांची भीषण धडक;दोघे जखमी, जीवितहानी टळली



**मलकापूर । प्रतिनिधी**

मलकापूर शहराजवळील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर हॉटेल सुर्या नजिक दोन ट्रकांची समोरासमोर जोरदार धडक होऊन मोठा अपघात झाला. ही घटना १९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४:३० वाजता घडली. या अपघातात दोघेजण जखमी झाले असून, वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मालवाहतूक करणारा ट्रक आणि भारत पेट्रोलियम कंपनीचा टँकर यांच्यात ही धडक झाली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचे समोरील भाग पूर्णतः चिरडले गेले. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. या घटनेमुळे वाहनचालकांनी महामार्गावरील सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर अधिक भर देण्याची गरज असल्याचे अधोरेखित झाले आहे.

# आमदार किसन कथोरे यांनी विकास प्रकल्पांसाठी नितीन गडकरी यांची भेट घेतली


**बदलापूर । प्रतिनिधी**



मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी नागपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या भेटीत मुरबाड मतदारसंघातील विविध विकास प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्यतः मुरबाड-माळशेज घाट रस्त्याचा रखडलेला विकास, माळशेज घाटातील बोगद्याचे काम, बदलापूर शहरासाठी रिंग रोडची निर्मिती, माळशेज घाटात व्हिव्हिंग गॅलरीसाठी निधीची मागणी आणि काटई नाका-नेवाळी-बोराडपाडा-म्हसा-धसई-माळशेज घाट या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याची मागणी या चर्चेचा मुख्य भाग होता.

किसन कथोरे यांनी विकासाला गती देण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवत गडकरी यांच्या माध्यमातून महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची मागणी पुन्हा पुढे नेली आहे. यामुळे मतदारसंघातील नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

# पोफाळी शिवारात शॉर्टसर्किटने उभ्या ऊसाला आग;६ एकर उस जळून खाक



**उमरखेड । प्रतिनिधी**

पोफाळी शिवारातील नत्था देवजी बरडे यांच्या शेतातील ६ एकरांतील उभा ऊस शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत जळून खाक झाल्याची घटना ११ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता घडली. या आगीत अंदाजे ३०० टन ऊस जळाल्याने शेतकऱ्यांचे ११.१० लाखांचे नुकसान झाले आहे. शेतातून जाणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या तारांमुळे शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याचे शेतकऱ्याचे म्हणणे आहे. भर दुपारी उसाने पेट घेतल्याने मोठे नुकसान झाले. या घटनेसाठी वीज विभागाच्या हलगर्जीपणाला जबाबदार धरत शेतकऱ्याने पोफाळी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.

नत्था देवजी बरडे यांनी नुकसान भरपाईची मागणी केली असून परिसरातील शेतकऱ्यांनीही त्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याचे आवाहन केले आहे. या घटनेमुळे वीज वितरण कंपनीच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# मंगलकलश यात्रेने पंचकल्याणक विधीची सुरुवात



**पुलगाव । प्रतिनिधी**

परमपूज्य आचार्य श्री १०८ सुवीरसागरजी महाराज संघ यांच्या उपस्थितीत आणि असंख्य जैन अनुयायांच्या उपस्थितीत श्रीमद १००८ मुनी सुव्रतनाथ जिनिबिंब पंचकल्याणक महोत्सव आणि विश्वशांती महायज्ञ १८ डिसेंबरपासून पुलगाव येथे सुरू झाला.१८ डिसेंबर रोजी सकाळी ध्वजारोहण व गर्भ कल्याणासाठी मंगल कलश यात्रा काढण्यात आली. या यात्रेत आचार्य श्री १०८ सुवीरसागरजी महाराज अग्रभागी होते. त्यानंतर १०८ महिला भगिनी मंगल कलश घेऊन चालत होत्या. पूजेसाठी स्त्री-पुरुष शुभ्र आणि मंगल वस्त्र परिधान करून पहिल्या रथामागे चालत होते. त्याचप्रमाणे रथावर बसलेल्या व्यक्तींमध्ये सौ. संध्या आणि किशोर बदनोरे, पंकज पोहरे, कुबेर इंद्र, पल्लवी, अमित बदनोरे, महायज्ञ नायक सीमा बदनोरे, प्रमोद काळे, मुख्य ध्वजारोहक सौ. सनिका आणि राहुल काळे यांचा समावेश होता. तिसऱ्या रथावर चक्रवर्ती, अमिता आणि प्रवीण बदनोरे, यज्ञ नायक परीक्षित मेघल आणि महामंडलेश्वर हे राजे बनले, तसेच स्मिता आणि संजय कुमार बदनोरे यांना बसविण्यात आले.

मंगल कलश यात्रा मंदिर परिसरात पोहोचल्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. दुपारी १ वाजता महायाग मंडळ विधानास प्रारंभ झाला. महाआरती आणि सायंकाळी ७ वाजता सोळा स्वप्ने करण्यात आली. रात्री १० वाजता गर्भाच्या कल्याणासाठी अंतर्गत विधी करण्यात आले.१९ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता शांती धारा सुरू झाली, आणि रात्री ९ वाजता आचार्य श्री १०८ सुवीरसागरजी महाराज यांचे शुभ प्रवचन झाले. याशिवाय, वेदशुद्धी, वेद विधी, वास्तुविधान, मातेचे बाळ स्नान, आचार्य श्रींचे शुभ प्रवचन आणि विविध शुभकार्ये संपन्न झाली.पुलगाव व परिसरातील जैन बांधव आणि विविध गावाहून आलेले जैन अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंचकल्याणकांच्या विधीद्वारे तीर्थंकरांचे गुण मूर्तीमध्ये बिंबवले जातात, म्हणून आत्म्यापासून भगवंतामध्ये परिवर्तनाच्या प्रक्रियेला पंचकल्याणक म्हणतात.

# जानेवारीत रंगणार मानाची 'अहिल्यानगर महाकरंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

**अहील्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सगळ्यात मोठी आणि मानाची एकांकिका स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी 'अहिल्यानगर महाकरंडक २०२५' ही एकांकिका स्पर्धा येत्या १६ ते १९ जानेवारी या कालावधीत सकाळी १० ते रात्री ९ यावेळेत अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात संपन्न होत आहे. गेल्या ११ वर्षांपासून 'अहमदनगर महाकरंडक' नावाने प्रसिद्ध असणारी ही स्पर्धा जिल्ह्याचे नाव 'अहिल्यानगर' असे बदलल्याने आता 'अहिल्यानगर महाकरंडक' नावाने ओळखली जाणार आहे. यंदाचं स्पर्धेचं हे १२वे वर्ष आहे. मागील एका तपात ही स्पर्धा राज्यातील सर्वात मोठी मानाची एकांकिका स्पर्धा म्हणून नाट्य वर्तुळात ओळख निर्माण केली आहे अनुष्का मोशन पिक्चर्स अँण्ड एंटरटेन्मेंट, शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित, श्री महावीर प्रतिष्ठान आयोजित व आय लव्ह नगरच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे. लेट्सअप हे या स्पर्धेचे डिजिटल पार्टनर आहेत. रंगकर्मींच्या अभिनय कौशल्याने सजलेल्या 'अहिल्यानगर महाकरंडक' एकांकिका स्पर्धा २०२५ या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या एकांकिका स्पर्धेला झी युवा या वाहिनीची साथ मिळाली आहे. झी युवा ही वाहिनी प्रायोजक म्हणून 'अहिल्यानगर महाकरंडक' २०२५ स्पर्धेत आपली भूमिका बजावत आहे.

या मांडवाखालून गेलेल्या अनेक कलावंतांनी मालिका चित्रपट आणि ओटीटी माध्यमात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. कलावंतांचे हक्काचे व्यासपीठ




म्हणून 'अहिल्यानगर महाकरंडक'ने एकांकिका विश्वात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. या स्पर्धेचा रंगमंच गाजवण्यासाठी राज्यभरातील कलावंतांनी जय्यत तयारी सुरू केली आहे. दरवर्षीप्रमाणे अत्यंत जल्लोषात आणि उत्साहात यंदाची स्पर्धा रंगेल असा विश्वास 'अहिल्यानगर महाकरंडक' समितीचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिला. एकांकिकांना स्पर्धेच्या माध्यमातून आर्थिक स्वरूपातील दमदार बक्षीस देऊन महाराष्ट्रातील नाट्य चळवळीला पाठबळ देण्याची भरीव कामगिरी माननीय नरेंद्र फिरोदिया हे गेले दशकभर सातत्याने करत आहेत.महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या बोधचिन्हाची अर्थातच 'महासंस्कृती' ची मोहोर २०२२ साली अहिल्यानगर महाकरंडक स्पर्धेवर उमटली.

> **"छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त या एकांकिका स्पर्धेचं यंदाचं 'उत्सव रंगभूमीचा, सोहळा शिवराज्या अभिषेकाचा' हे ब्रीदवाक्य आहे.**

आत्तापर्यंत स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी मराठी चित्रपट सृष्टीतील महेश मांजरेकर, भरत जाधव, अंकुश चौधरी, केदार शिंदे, सिद्धार्थ जाधव, मंगेश कुलकर्णी, श्रीरंग गोडबोले, सोनाली कुलकर्णी, स्वप्नील जोशी हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून आलेले आहेत. तर केदार शिंदे, सुजय डहाके, विजय पाटकर, किरण यज्ञोपवित, विकास कदम, प्रवीण तरडे, हेमांगी कवी, सुनील बर्वे, पुरुषोत्तम बेर्डे, विजय पाटकर, स्व. अतुल परचुरे, संजय मोने, श्वेता शिंदे, चंद्रकांत कुलकर्णी ह्यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिलेले आहे.स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास १,५१,१११/- रुपये रोख, अहिल्यानगर महाकरंडक आणि प्रमाणपत्र असे पारितोषिक मिळणार आहे. तसेच विक्रमी रकमेची सांघिक आणि वैयक्तिक बक्षिसे देखील असणार आहेत. महाराष्ट्रातील एकांकिकांसाठी इतक्या मोठ्या रकमेची आकर्षक पारितोषिके देणाऱ्या निवडक स्पर्धांमधील प्रमुख स्पर्धा म्हणून 'अहिल्यानगर महाकरंडक' स्पर्धेने स्वतःचा नावलौकिक गेल्या दशकभरात कमावला आहे.

# श्री दत्त महाराजांच्या जयंती उत्सवात स्वामी सेवा मार्गाविषयी मार्गदर्शन

**अहील्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र कोल्हार येथील राजुरी रोड स्थित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्रात परम पूज्य श्री गुरुमाऊलींच्या कृपाशीर्वादाने श्री दत्त महाराजांच्या जयंती उत्सव निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडला.




या सप्ताहाच्या सांगता प्रसंगी स्वामी सेवा मार्गाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ स्वामी सेवेकरी बेबीताई कडू यांचे मार्गदर्शन झाले. त्यांनी सांगितले की, परमपूज्य श्री गुरुमाऊलींनी स्वामी सेवा मार्ग सर्वांसाठी सोपा करून ठेवले आहे. दररोज सकाळी पंचमहायज्ञ करणे, घरातील ज्येष्ठ मंडळींची काळजी घेऊन स्वामी सेवा मार्गाला वेळ देणे, स्वामी चरित्र सारामृताचे तीन अध्याय पठण करून अकरा मण्यांची श्री स्वामी समर्थ जप करणे, हे सर्व स्वामी सेवा मार्गाचे महत्वाचे अंग आहेत. त्यांनी सांगितले की, २०टक्के अध्यात्म आणि ८० टक्के समाजकारण करून गोरगरीब घटकांपर्यंत पोहोचून त्यांचे जीवन समृद्ध आणि सुसंस्कृत करणे हे गुरुमाऊलींचे स्वप्न आहे. या मार्गदर्शनामुळे उपस्थित भक्तांमध्ये एक नवा उत्साह निर्माण झाला. यावेळी श्रीक्षेत्र कोल्हार भगवतीपुर परिसरातील मोठ्या प्रमाणात भक्त आणि महिला सेविकांची उपस्थिती होती. यावेळी स्वामी सेवेकरी विजय डेंगळे, संजय राऊत, किशोर निवे, अनिल खर्डे आणि इतर सेवेकऱ्यांनी आपल्या योगदानाचा उल्लेख केला. तसेच, महिला सेवेकरी देशपांडे , मोरे , आणि शेलार यांनी आपले अनुभव यावेळी व्यक्त केले. स्वामी सेवेकरी विजय डेंगळे यांनी श्री दत्त बावन्नी म्हणून मंत्रमुग्ध करणारा उच्चार केला. यावेळी, पुढील वर्षी स्वामी पुण्यतिथी सप्ताह प्रसंगी कोल्हार गावातून ग्रंथदिंडी काढण्याचा निर्णय घेतल्याचे ज्येष्ठ स्वामी सेवेकरी सुधीर खर्डे यांनी सांगितले. सप्ताह यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अनेक स्वामी सेवेकऱ्यांचा सहभाग होता, आणि महाप्रसादाचे आयोजन देखील मोठ्या प्रमाणात करण्यात आले.

# राहुरीत ३० वर्षांतील नीचांकी तापमानाची नोंद

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यात तीन दशकातील रात्रीच्या नीचांकी तापमानाची १८ डिसेंबर रोजी नोंद झाली. १८ डिसेंबर रात्रीचे किमान तापमान ६.५ अंश सेल्सिअस होते. १९९९ च्या नऊ जानेवारीला ३.१ इतके कमाल तापमान नोंदविले गेले होते. त्यानंतर तापमानाचा नीचांकी पारा काल राहुरी कृषी विद्यापीठाच्या हवामान केंद्रात नोंद झाली. ३० वर्षांतील दुसऱ्या नीचांकी किमानतापमान १८ डिसेंबरला नोंदले गेले. उत्तरेकडे अरबी समुद्रात जो कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे उत्तरेकडील थंड हवा दक्षिणेकडे वाहत होती. त्यामुळे तापमानाचा रात्रीचा पारा एकदम कमी झाला असल्याचे महात्मा फुले कृषी विद्यापीठातील भारतीय हवामानशास्त्र विभागाचे डॉ. रवी आंधळे यांनी सांगितले. आणखी दोन ते तीन दिवस थंडीची लाट राहणार असल्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

मध्य महाराष्ट्रात हा प्रभाव अधिक होता. तुलनेत दक्षिण महाराष्ट्रात थंडीचा तडाखा तुलनेत कमी होता. गहू, हरभरा या पिकांसाठी ही थंडी उपयुक्त असली तरी द्राक्ष व अन्य फळ पिकांसाठी




मात्र, ही थंडी प्रतिकूल ठरणार आहे. थंडीने जनजीवन एकदम गारठून गेले आहे. थंडीचा जनजीवनावर विपरीत परिणाम झाला आहे. सर्दी, खोकला अशा रुग्णांची संख्या वाढली आहे. तसेच थंडीचे उबदार कपडे, रग, स्वेटर, कानटोप्या यांची देखील मागणी वाढली आहे. रात्री शेकोट्यांचाही आधार घेतला जात आहे. ११ ते १८ डिसेंबर किमान तापमान अंश सेल्सिअस मध्ये असे नोंदले गेले. कमाल तापमानात मात्र विशेष वाढ व घट झालेली नाही ते २७ ते २८ओसे दरम्यान होते.

# कोल्हारमध्ये अतिक्रमण काढण्यासाठी शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

**कोल्हार । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातील कोल्हार बु येथील चारी क्रमांक तीन च्या कडेला गट क्रमांक १७७ शेजारील अतिक्रमण काढण्यासाठी कारवाई न झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

स्थानिक शेतकरी श्री गोपाळा कोंडाजी राऊत आणि त्यांचे सहकारी गट क्रमांक १७७ मधील रहिवासी असून, यापूर्वीही त्यांनी आमरण उपोषण करण्याची तयारी केली होती. तथापि काही तांत्रिक अडचणीमुळे ते उपोषण टाळले होते. परंतु अनेक दिवस उलटले तरी अतिक्रमण काढण्यासाठी कोणतीही कारवाई केली गेली नाही, आणि दुसरा पर्याय न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी सामूहिक आमरण उपोषण सुरू केले आहे.

तसेच, याबाबत संबंधित शासकीय कार्यालयाला पत्रक पाठवले असून, शासन दरबारी लवकरात




लवकर या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती स्थानिक रहिवासी शेतकऱ्यांनी सह्याद्रीचा राखणदार या दैनिकाचे वार्ताहर श्री गणेश सोमवंशी यांच्याशी बोलताना केली आहे.

# तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला अधिवेशनात एकमताने मंजुरी : राधाकृष्ण विखे पाटील

**राहुरी । प्रतिनिधी**

तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला अधिनियमात रुपांतरीत करण्यात आले. नागपूर हिवाळी आधिवेशनात विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संदर्भात मांडलेल्या विधेयकाला सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरीकांनी खरेदी केलेल्या १ गुंठा, २ गुंठे, ३ गुंठे अशा क्षेत्रांचे तुकडे नियमानुकूल होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास ना.विखे पाटील यांनी व्यक्त केला.तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेला १० ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेऊन राज्यपाल यांच्या मान्यतेने अध्यादेश प्रसिध्द करण्यात आला होता. या अध्यादेशाचे आज विधिमंडळाच्या मान्यतेने अधिनियमात रुपांतर झाले आहे. सन १९४७ साली अमलात आलेल्या तुकडेबंदी कायद्यातील तरतुदी नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रमाणभूत क्षेत्र ठरविण्यात आले होते. मात्र याप्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण करण्यास कायद्याने निर्बंध आहे. यामुळे सर्वसामान्य नागरीकांच्या अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या.



२०१७ साली करण्यात आलेल्या सुधारणे नुसार सन १९६५ ते २०१७ या कालावधीत झालेले तुकड्यांचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजार मुल्याच्या २५ टक्के रक्कम शासन जमा करणे आवश्यक होते. मात्र ही रक्कम सर्वसामान्य नागरीकांच्या आवाक्या बाहेर होती.या अडचणींमुळे नागरीकांचे आर्थिक व्यवहारही थांबले होते. ही अडचण दुर करण्यासाठी महायुती सरकारने प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राची खरेदी विक्री करुन झालेले व्यवहार नियमित करण्यासाठी २०१७ सालापर्यंत असलेली मुदत २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत निर्णय करुन, २५ टक्क्याऐवजी ५ टक्के शुल्क भरुन या जमीनी नियमानुकूल करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलेली होती.

मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार राज्यपालांच्या संमतीने १५ आक्टोंबर २०२४ रोजी अध्यादेशही काढण्यात आला होता. या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी मंत्री विखे पाटील यांनी विधान परिषद आणि विधानसभेमध्ये याबाबतचे विधेयक सादर केले. या विधेयकाला दोन्हीही सभागृहात मान्यता मिळाल्याने तुकडा बंदी कायद्यातील सुधारणेचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचा मोठा दिलासा राज्यातील नागरीकांना मिळणार असून, याबाबत महसूल विभागाने माजी सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या नेमलेल्या समितीच्या शिफारसीही यासाठी विचारात घेण्यात आल्या आहेत.

# अहिल्यानगरचे भाजपचे राम शिंदे यांना देण्यात आली मोठी जबाबदारी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजप नेते राम शिंदे यांना विधानपरिषद सभापती म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली आहे. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर महायुतीने सरकार स्थापन केले असून, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले आहेत. उपमुख्यमंत्रीपदी अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचाही समावेश झाला आहे.

विधानपरिषदेचे सभापतीपद रिक्त असल्याने, या पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेत फक्त राम शिंदे यांचा अर्ज दाखल झाला, ज्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली. विधानपरिषदेचे सभापतीपद मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राम शिंदे यांना शुभेच्छा दिल्या.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात राम शिंदे यांचे अभिनंदन करत, त्यांच्या योग्यतेवर विश्वास व्यक्त केला. त्यांनी म्हटले, राम शिंदे हे शिक्षण क्षेत्रातील अनुभवी प्राध्यापक आहेत, आणि त्यामुळे मला विश्वास आहे की ते सभागृहाचे कारभार अत्यंत शिस्तीने आणि संवेदनशीलतेने चालवतील. रामराजे निंबाळकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ७ जुलै २०२२ पासून विधानपरिषदेचे सभापतीपद रिक्त होते. या पदासाठी १८ डिसेंबरपर्यंत अर्ज मागविण्यात आले होते, आणि १९ डिसेंबर रोजी निवडणूक होईल असे सांगण्यात आले होते. मात्र, यासाठी फक्त राम शिंदे यांचा अर्ज दाखल झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

# समता परिषदेच्या वतीने माळीवाडा येथे सरकारचा निषेध छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न देण्याची टीका

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहरातील माळीवाडा येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने ओबीसींचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांना महायुती सरकारने मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने जाहीर निषेध केला. यावेळी महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ निदर्शनं करून काळी फीत लावण्यात आली. समता परिषदेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते, यामध्ये प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, महानगर अध्यक्ष दत्ता जाधव, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, रामदास फुले, अनिल निकम, खंडू भुकन, किसनराव रासकर, गोरख आळेकर, मोहित चौधरी, तुषार भुजबळ, प्रशांत शेरकर, राजू गाडेकर, शाहू होले, संकेत खामकर, सौरभ भुजबळ आणि निशांत शिंदे यांचा समावेश होता.

या घटनेवर जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटले की, महायुती




सरकारने मंत्रिमंडळ विस्तार केला, पण छगन भुजबळ यांना डावलले. यामुळे राज्यभर असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. लोंढे यांनी सरकारला इशारा देत सांगितले की, समता परिषदेच्या माध्यमातून याचा बदला घेतला जाईल.

अंबादास गारुडकर यांनी यावेळी छगन भुजबळ यांच्या योगदानाचे कौतुक केले. ते म्हणाले की, छगन भुजबळ हे ओबीसींच्या हक्कांसाठी अनेक वर्षे भक्कमपणे लढत आहेत. परंतु सरकारला त्यांचे कार्य योग्य वाटत नसल्याने त्यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्यामुळे जनतेमध्ये नकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

तसेच, दत्ता जाधव आणि डॉ. नागेश गवळी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सर्व उपस्थितांनी काळी फीत बांधून सरकारचा निषेध केला.

# पक्का रस्ता आणि स्ट्रीट लाईट तातडीने उभारा

## देवालय सोसायटीमधील नागरिकांची मागणी

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती शहरातील विंजासन रोडवरील देवालय सोसायटीत पक्का रस्ता आणि स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे येथील नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळकी यांच्याकडे नुकतीच करण्यात आली. देवालय सोसायटीत गेल्या ५ वर्षांपासून १५० कुटुंबे स्थायिक असूनही मूलभूत नागरी सुविधांचा अभाव आहे. येथे पक्का रस्ता आणि स्ट्रीट लाईट नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर चिखल व पाणी साचल्यामुळे नागरिकांना ये-जा करणे कठीण होते. खराब रस्त्यामुळे अपघातांची मालिका सुरू असून काही प्रकरणांमध्ये



गंभीर दुखापत व मृत्यूही झालेले आहे. ६ दिवसांपूर्वी झालेल्या दुर्दैवी अपघातांमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. याशिवाय, स्ट्रीट लाईट नसल्याने परिसरात अंधार पसरलेला असतो. त्यामुळे महिलांसह जेष्ठ नागरिक व लहान मुलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. अंधाराचा फायदा घेऊन चोरीसारख्या घटना घडण्याचीही भीतीही नाकारता येत आहे. यासंदर्भात सोसायटीमधील नागरिकांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळकी यांना निवेदन सादर केले. त्यात विजय पारखी व भरत बेलकुटे यांच्या घरापासून देवालय सोसायटी गेटपर्यंत पक्का रस्ता बांधून डांबरीकरण करण्यात यावे. स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन सादर करताना श्याम चटपल्लीवार, अंजय्या पुल्लूरवार, शुक्राचार्य तेलतुंबडे, एम. कांबळे, पपिया बाला, सीमा वाकडे, शिल्पा नगराळे, रेश्मा मेंघरे, प्रियंका राजूरकर, वैशाली तेलतुंबडे, अनिता यादव, किरण राऊत, वंदना बोम्रतवार, हर्षदा चटपल्लीवार, मंदा तवाडे, कविता कांबळे, त्रिरार्णा उईके, हिना चंदनकर, रिना निमसरकर, स्नेहा कांबळे यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संदर्भात पालिका प्रशासन काय कार्यवाही करणे याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय कराटे स्पर्धेत हुतात्मा स्मारक कराटे क्लबच्या खेळाडूंचे सुयश

**भद्रावती । प्रतिनिधी**

औरंगाबाद येथे पार पडलेल्या आठव्या फा-हियान राष्ट्रीय ओपन कराटे कप २०२४ या स्पर्धेत शहरातील हुतात्मा स्मारक कराटे क्लबच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत सात सुवर्ण तर पाच रजत पदके प्राप्त केली केले. सदर स्पर्धेत देशभरातील १५०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. साची चावरे हिने मुलींच्या १० व ११ वयोगटांमध्ये फाईट व काता या प्रकारात दोन सुवर्णपदके प्राप्त केली, नैताकी बनपुरकर याने मुलांच्या दहा व अकरा वयोगटांमध्ये फाईट व काता या प्रकारात दोन सुवर्णपदके प्राप्त केली. जिया घोडे हिने मुलींच्या बारा व तेरा या वयोगटात फाईट व काता प्रकारात एक सुवर्ण व एक रजत पदक प्राप्त केले. सोनाक्षी कोंडस्कर हिने मुलींच्या अकरा व बारा वयोगटात फाईट व काता प्रकारात एक सुवर्ण तर एक रजत पदक प्राप्त केले. शोर्धाज राज याने मुलांच्या अकरा व बारा या वयोगटात फाईट व काता या प्रकारात एक सुवर्ण व एक रजत पदक प्राप्त केले. तर साक्षी कपाट हिने मुलींच्या ९ व १० वयोगटात फाईट व काता या प्रकारात दोन रजत पदके प्राप्त केले. सदर खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय राकेश दीप, शितल तेलंग, अशी आशीष रीगने, संदीप चावरे,




पिंटू मरस्कोल्हे, दामिनी सूर्यवंशी व आपल्या आई-वडिलांना दिले आहे. यश प्राप्त केल्याबद्दल सदर खेळाडूंचे शहरात सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.

# लोकनियुक्त सरपंच प्रदीप चव्हाण यांचा स्तुत्य उपक्रम-अपघाती विमा पॉलिसी उतरवली

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव तालुक्यातील धोत्रे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी लोकनियुक्त सरपंच प्रदीप चव्हाण यांनी स्वखर्चाने अपघाती विमा पॉलिसी उतरवली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना पुढील पाच वर्षांसाठी दहा लाख रुपयांचे विमा कवच मिळणार आहे, ज्यामुळे त्यांना सुरक्षिततेचा एक महत्त्वपूर्ण आश्वासन मिळालं आहे.

विमा पॉलिसी सरपंच प्रदीप चव्हाण यांच्या संकल्पनेतून सर्व ग्रामपंचायत कर्मचार्यांना पोस्टामार्फत दिली आहे. पाणीपुरवठा, वीज पुरवठा किंवा प्रवासादरम्यान अनेक वेळा कर्मचाऱ्यांना मोठ्या धोक्याचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीमध्ये कधी तरी अपघात होण्याची शक्यता असते, ज्यामुळे काही कर्मचाऱ्यांचे निधन किंवा अपंगत्व झालं आहे. याच पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांना विमा कवच देण्याचा निर्णय



घेण्यात आला.सर्व स्तरातून या प्रेरणादायी निर्णयाचे कौतुक होत आहे. लोकनियुक्त सरपंच प्रदीप चव्हाण यांनी यावेळी सांगितले की, या निर्णयामुळे कर्मचार्यांमध्ये आनंदाची लाट निर्माण झाली आहे. त्यांना असा सरपंच पहिला वेळा भेटला आहे, जो त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करत आहे.पोस्ट ऑफिस धोत्रे गावचे ब्रांच पोस्ट मास्तर दत्तात्रय घोडगे यांच्या मदतीने विमा काढला गेला. या उपक्रमाबद्दल सरपंच प्रदीप चव्हाण यांचे ग्रामसेवक अविनाश पगारे तसेच सदस्य आणि कर्मचारी नारायण पोटे, भारत चव्हाण, सागर शिंदे, दिलीप गुंजाळ यांनी आभार मानले.

# सोयाबीन चोरी करणारे ८ आरोपी जेरबंद



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जामखेड तालुक्यात सोयाबीन चोरी करणाऱ्या आठ संशयित आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाराशिव येथून ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ६ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या आरोपींमध्ये दादाराव शामराव शिंदे (वय ५०), अनिल भिमराव शिंदे, संजय सुभाष पवार, सुनील भिमराव शिंदे, विशाल दादाराव शिंदे, शंकर विलास शिंदे, आदिनाथ आबा शिंदे (सर्व रा. मांडवा, ता. वाशी, जि. धाराशिव), आणि शंकर लगमन काळे (रा. कन्हेरवाडी, ता. कळंब, जि. धाराशिव) यांचा समावेश आहे.

जामखेड तालुक्यातील नायगाव, झिक्री आणि राजुरी परिसरात सोयाबीनच्या चोरीचा गुन्हा खर्डा पोलिसांत दाखल करण्यात आला होता. या घटनेची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळाली, त्यावरून गुन्हे शोध पथकाने सापळा रचून आरोपींना धाराशिव येथून ताब्यात घेतले. या आरोपींविरुद्ध खर्डा पोलिसांत पुढील कारवाई सुरू आहे.

# ढाणकी नगरपंचायतचा अवास्तव संकल्प रद्द करण्याची मागणी

**उमरखेड । प्रतिनिधी**

ढाणकी शहर काँग्रेस कमिटीने नगरपंचायत प्रशासनाला एक महत्त्वाची मागणी केली आहे. ढाणकी नगरपंचायतच्या सन २०२५/२०२६ च्या संकल्पात काही नवीन करांची अंमलबजावणी केल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष आहे. नगरपंचायतने शैक्षणिक कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर आणि इतर कर लावले आहेत, तसेच वाढीव कर लागू केले आहेत, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा आर्थिक बोजा अधिक वाढला आहे.

गावाच्या शहरीकरणाच्या आणि विकासाच्या वाद्यावर ढाणकी गावातील नागरिक खुश होते, पण नगरपंचायतच्या या नव्या करांच्या वाढीमुळे त्यांना



फायद्याऐवजी फक्त आर्थिक दबाव मिळाल्याची स्थिती आहे. ढाणकी शहर काँग्रेस कमिटीने यावर निषेध व्यक्त करत नगरपंचायतच्या मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे आणि या संकल्पाचे रद्द करणं आवश्यक असल्याचा इशारा दिला आहे. निवेदनात सांगण्यात आले की, सध्याच्या दुष्काळ, महागाई, बेरोजगारी आणि शेतीच्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर नव्या करांचा अतिरिक्त बोजा नागरिकांना सोडवण्याऐवजी अधिक ताण देणार आहे. शहराच्या विकासासाठी सुविधांची आवश्यकता आहे, परंतु विकासाच्या कामांसाठी कोणतीही ठोस योजना किंवा कार्यवाही दिसत नाही.

ढाणकी शहर काँग्रेस कमिटीने नगरपंचायत प्रशासनाला चेतावणी दिली आहे की, जर हे अतिरिक्त कर रद्द केले नाहीत, तर लोकशाही मार्गाने जनआंदोलन केले जाईल आणि त्यासाठी नगरपंचायत प्रशासन जबाबदार राहील. निवेदन देताना बाळासाहेब चंद्रे, अमोल तुपेकर, बाबुराव नरवाडे, रमेश गायकवाड, रुपेश भंडारी, गजानन मिटकरे, अक्षय रमेश भगत, शुभम मुनेश्वर, नामदेव गोपेवाड, साहेबराव वाघमोडे, सुधाकर बाबुळकर आणि इतर नागरिक उपस्थित होते.

# कागदी कपांतील मायक्रोप्लास्टिकचा धोका : भंडारा सज्ज होईल का

**भंडारा । प्रतिनिधी**

बुलडाणा जिल्ह्यात कागदी चहा कपांवरील बंदीच्या निर्णयानंतर भंडारा जिल्ह्यातही याच विषयावर तीव्र चर्चा सुरू झाली आहे. नागरिक, कार्यालयातील कर्मचारी आणि चहा टपऱ्यांवर या निर्णयाबाबत उत्सुकता दिसून येत आहे. भंडाऱ्यातही प्लास्टिक आणि कागदी कपांवर बंदी लागू होणार का? हा सध्या चर्चेचा मुख्य विषय बनला आहे.



बुलडाणा जिल्ह्यातील जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी कॅन्सरसारख्या आजारांना कारणीभूत ठरणाऱ्या कागदी चहा कपांवर बंदी घातली आहे. कागदी कपांमध्ये वापरल्या जाणाऱ्या मायक्रोप्लास्टिक व बीपीए (बिसफेनॉल-ए) केमिकलमुळे आरोग्यावर होणारे घातक परिणाम लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली आहे.

भंडारा जिल्ह्यात यासंबंधी ठोस निर्णय न झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून वाचण्यासाठी कागदी आणि प्लास्टिक कपांवर तातडीने बंदी आली पाहिजे, असे अनेकांचे म्हणणे आहे. चहा किंवा गरम पाणी कागदी कपात टाकल्यास वितळणाऱ्या मायक्रो प्लास्टिकचे कण शरीरात जातात, ज्यामुळे कॅन्सर, पचनसंस्थेचे आजार आणि हार्मोनल विकार होण्याचा धोका वाढतो. भंडाऱ्यातील प्रत्येक चहा टपरीवर या निर्णयाविषयी चर्चा सुरू आहे. बुलडाण्यानंतर भंडाऱ्यातही बंदी येणार का? आणि चहा कपांसाठी पर्यावरणस्नेही पर्याय काय असू शकतात? असे प्रश्न नागरिक विचारत आहेत. गरम चहासोबत शरीरात जाणाऱ्या प्लास्टिकमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक धोक्यांबद्दल जागरूकता वाढत आहे.

# राम शिंदे समर्थकांचा कर्जतमध्ये आनंदोत्सव

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

माजीमंत्री आमदार प्रा. राम शिंदेंना विधान परिषद सभापतीची उमेदवारी जाहीर झाल्याच्या आनंदात कर्जत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजप आणि महायुतीकडून जल्लोष करण्यात आला. फटाके फोडून तसेच एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

प्रा. राम शिंदेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सभापती पदाचा अर्ज दाखल केला. यावेळी कर्जत भाजप आणि महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष केला. बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, भाजपा तालुकाध्यक्ष शेखर खरमरे, शिवसेना शिंदे गटाचे बापूसाहेब नेटके, जिल्हा बँकेचे संचालक अंबादास पिसाळ, दादा सोनमाळी, जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे,



उपसभापती अभय पाटील, अशोक खेडकर, चिंतामणी मुरकुटे, गणेश क्षीरसागर, सुनील यादव, दत्तात्रय मुळे, काका धांडे, बंटी यादव, महेंद्र धांडे, काका ढेरे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.राम शिंदे यांच्या समर्थकांनी त्यांच्याच विजयासाठी घोषणा दिल्या. शेखर खरमरे यांनी सांगितले की, प्रा. राम शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू शिलेदार असून, त्यांनी नेहमीच संकटाच्या काळात भूमिका बजावली आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत, त्यांनी रोहित पवारांना चांगली टक्कर दिली आणि शेवटच्या क्षणी अवघ्या १,२४३ मतांनी पराभव स्वीकारला. परंतु पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास टाकत विधान परिषद सभापती पदाची उमेदवारी जाहीर केली, याचा कर्जत-जामखेडकरांना अभिमान आहे

# परभणीतील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना;श्रीरामपूरात निषेध

**श्रीरामपूर । अतुल देसर्डा**

परभणी जिल्ह्यात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याच्या घटनेचा सोमवारी श्रीरामपूरात तीव्र निषेध करण्यात आला. या संदर्भात श्रीरामपूर बंद पाळण्यात आला आणि रेल्वे स्थानकासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून निषेध सभा घेण्यात आली. यावेळी बोलताना भाजपचे शहर उपाध्यक्ष आणि मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे यांनी परभणीत भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याचा आरोप केला. ते म्हणाले, या घटनेचा निषेध करण्यासाठी झालेल्या आंदोलनात सोमनाथ सूर्यवंशी या भीमसैनिकास पोलिसांनी दंगलीच्या गुन्ह्यात अटक करून पोलीस कोठडीत डांबले होते.



पोलिसांच्या मारहाणीत त्यांचा करुण मृत्यू झाला, ही अतिशय संतापजनक घटना आहे. साळवे यांनी आणखी सांगितले की, नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले आहे, त्यात पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणाची सी.आय.डी. चौकशी करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. याप्रकरणी दोषींविरुद्ध कठोर कारवाई झाली पाहिजे. निषेध सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अरूण पाटील नाईक, समाजवादी पक्षाचे जोएफ जमादार, रिपाइंचे सुभाष त्रिभुवन, भीमशक्तीचे संदीप मगर तसेच वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला.

# जिल्ह्यात गुलाबी रिक्षा साठी ३१६ अर्ज दाखल; ५४ मंजूर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महिला आणि बालविकास विभागाच्या वतीने महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'पिंक ई-रिक्षा' योजनेसाठी प्रतिसाद वाढत असून अहिल्यानगरमधून ३१६ महिलांनी या योजनेसाठी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी ५४ अर्ज मंजूर झाले आहेत. दरम्यान या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांनी अर्ज करावे, असे आवाहन ही जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

महिला व बालविकास विभागाने ही योजना जाहीर केली असून, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे काम रखडले होते. आता पुन्हा अर्जनोंदणी आणि छाननी प्रक्रिया सुरू झाली आहे. सध्या आठ जिल्ह्यांतून ३ हजार २५५ महिलांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी ७४४ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरित अर्जाची छाननी सुरू आहे. अहिल्यानगरमधून ३१६ पैकी ५४ अर्ज मंजूर केले आहे.



# शेतमजुरातून उद्योजकतेचा प्रवास
# हरिमामा फराटे यांचे प्रेरणादायी जीवन






**शिरूर । रमेश बनसोडे**

शेतमजूर म्हणून जीवनाची सुरुवात करून अथक परिश्रम, सहनशीलता आणि दृढ इच्छाशक्तीच्या जोरावर यशस्वी उद्योजक बनलेल्या हरिमामा अर्थात हरिभाऊ मोहनराव फराटे यांची जीवनकहाणी प्रेरणादायी आहे. पुणे जिल्ह्यातील मांडवगण फराटा गावचे रहिवासी असलेल्या हरिमामा यांनी आर्थिक चणचणीच्या परिस्थितीतून आपल्या कुटुंबाला सावरत स्वतःचा व्यवसाय उभा केला.

हरिमामा यांचा जन्म १९७७ साली एका गरीब कुटुंबात झाला. शेती नसल्याने रोजच्या उदरनिर्वाहासाठी त्यांच्या वडिलांनी १९८५ साली कमी भांडवलात हॉटेलची टपरी सुरू केली. त्यावेळी चहा ७५ पैशाला मिळत होता. सहा वर्षांच्या वयातच हरिमामा यांनी आपल्या वडिलांना मदत करण्यासाठी कपबश्या धुण्यापासून छोटे-मोठे काम सुरू केले.छोट्या टपरीला हॉटेलमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न केला असता आर्थिक अडचणींनी मार्ग रोखला. प्रतिसाद न मिळाल्याने कुटुंब पुन्हा आर्थिक संकटात सापडले. त्यामुळे हरिमामा यांनी काही काळ मजुरी व ऊस तोडणीचे काम केले. पण या कठीण परिस्थितीतही त्यांनी हार मानली नाही.हरिमामा यांनी मित्रांच्या प्रेरणेने पुन्हा व्यवसाय सुरू केला. ग्राहकांसोबत प्रामाणिक, प्रेमळ व नम्र संबंध ठेवून व्यवसायाला नवे रूप दिले. हॉटेल शिवराज हरिमामा चहा हा स्वतःचा ब्रँड निर्माण केला. चहा, मिसळ, वडा पाव व भेळ यांसारख्या पदार्थांमुळे ग्राहकांची पसंती मिळवली.व्यवसायात यश मिळवून हरिमामा यांनी सामाजिक कामांमध्येही सहभाग घेतला. त्यांची मेहनत आणि नेतृत्व पाहून त्यांना पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघात तालुका उपाध्यक्ष आणि जिल्हा संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली.हरिमामा यांचा प्रामाणिकपणा, सहनशीलता आणि सामाजिक भान त्यांच्या मुलानेही आत्मसात केले आहे. त्यांचे यश आणि संघर्ष नवउद्योजकांना प्रेरणा देणारे ठरले आहे.हरिमामा फराटे यांची ही कहाणी सिद्ध करते की, इच्छाशक्ती आणि मेहनत यांच्या जोरावर कोणताही माणूस संकटांवर मात करून यशस्वी होऊ शकतो.

## गुणवत्त तपासणीसाठी गटशिक्षणाधिकारी उजगरे यांच्या शाळांना अचानक भेटी

**वडवणी (प्रतिनिधी):** वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी काल दि.१७ मंगळवार रोजी शाळांमधील गुणवत्ता तपासणीसाठी अचानक वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्रातील सवासेवाडी शाळेसह इतर काही शाळांना अचानक भेटी दिल्या व येथिल विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तपासून या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून त्यांनी शिक्षकांच्या कामाचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी काल दि. १७ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ९ वाजतापासून शाळांमधील गुणवत्ता तपासणीसाठी अचानक वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्रातील सवासेवाडी शाळेसह इतर काही शाळांना अचानक भेटी दिल्या. पहिली भेट दिलेल्या सवासेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांचा दैनंदिन परिपाठ गटशिक्षणाधिकारी उजगरे यांच्या उपस्थितीत पार पाडला. यावेळी त्यांच्या समवेत चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, वडवणी कन्या केंद्राचे केंद्रप्रमुख शेख सैलानी सर उपस्थित होते. या भेटीमध्ये गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे व सहकारी यांनी भेट दिलेल्या शाळांची गुणवत्तेची सखोल तपासणी केली.यामध्ये सवासेवाडी शाळेतील सर्व विद्यार्थी इंग्रजी व मराठी उत्तमरित्या वाचन व लेखन करत असल्याचे त्यांना दिसून आले. तसेच गणित विषयातील पायाभूत क्षमता यांची तपासणी करुन समाधान व्यक्त केले. आणि मागील वर्षी मंथन व ओलिम्पीयाड स्पर्धा परिक्षेत राज्य व तालुका स्तरावर यश संपादन केलेले चि. अथर्व नागरगोजे, कु. तनिष्का बडे, प्रणाली सवासे, संस्कृती सवासे, विराट मुंडे व इतर सर्व मुलांचे साहेबांनी कौतुक करुन त्यांना भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. डोंगरपट्यातील सवासेवाडी सारख्या दुर्गम व ग्रामीण भागातील वस्तीवर अत्यंत हुशार व बुध्दिमान मुले शाळेत उत्तमरित्या शिक्षण घेत असल्याने त्यांना घडविण्याचे कार्य करत असलेले शिक्षक नागरगोजे बी.बी.सर व आरसेवार पी.एस. सर यांचे कौतुक करुन अभिनंदन केले.

## खोलेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.प्रीती पोहेकर

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** शहरातील खोलेश्वर महाविद्यालय हे एक नामांकित महाविद्यालय असून दोन वर्षांपूर्वीच या महाविद्यालयाने आपला सुवर्ण महोत्सव साजरा केला. नुकतीच या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. प्रीती पोहेकर यांची नियुक्ती करण्यात आली .डॉ. पोहेकर या यापूर्वी लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर त्यांनी भा.शि.प्र. संस्थेच्या स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य पदाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला व आता त्यांची नियुक्ती संस्थेच्याच खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल त्यांचा भा.शि.प्र. संस्था व खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांची उपस्थिती होती. तर व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. कल्पनाताई चौसाळकर, आप्पाराव यादव, वर्षाताई मुंडे तसेच खोलेश्वर शैक्षणिक संकुल, अंबाजोगाईच्या स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर, खोलेश्वर जीनियस सीबीएससी स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव चौसाळकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर व केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. कल्पनाताई चौसाळकर यांनी डॉ. पोहेकर यांना आपल्या मनोगताद्वारे शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. प्रीती पोहेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. मनोगताद्वारे त्यांनी महाविद्यालयाची वैभवशाली परंपरा वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन यावेळी दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांनी अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. प्रीती पोहेकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन आपण आपल्या ज्ञानाचा व प्रशासकीय अनुभवाचा उपयोग महाविद्यालयास वैभवशाली बनविण्यासाठी कराल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही डॉ. पोहेकर यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पिपरी मेघे येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**

स्थानिक पिपरी मेघे येथे भाजपचे जिल्हा महामंत्री अर्चना वानखेडे (मुडे) यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्व. विजयराव मुडे सोशल फाउंडेशन वर्धा आणि भारतीय जनता पक्ष पिपरी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने १८ डिसेंबर बुधवार रोजी सकाळी १०.३० ते १.३० या कालावधीत ग्रामपंचायत पिपरी मेघे येथील सुविधा केंद्र येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



**रक्तदान शिबीरात भेटवस्तू देतांना माजी खासदार रामदासजी तडस, अध्यक्ष सुनिल गफाट, अर्चना वानखेडे व अन्य.**

कार्यक्रमाला माजी खासदार रामदासजी तडस, भाजपचे जिल्हा अध्यक्ष सुनील गफाट, स्व. विजयराव मुडे सोशल फाउंडेशन व जिल्हा महामंत्री अर्चना वानखेडे (मुडे), रवीभाऊ शेंडे (अध्यक्ष पिपरी मेघे भाजप), फारूकभाई शेख, राजहंस राऊत, वर्षा बोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमामध्ये ३० व्यक्तींनी रक्तदान केले. रक्तदान शिबीराचे आयोजन Central India Institute of Hematology Oncology, नागपूर येथील आरोग्य विभागाच्या तज्ञांनी केले. कार्यक्रमाला जयश्री गफाट, वर्षा देशपांडे, श्रेया देशमुख, चित्रा ठाकूर, सरस्वती मडावी, प्रतिभा बाकडे, मंजुशा दुधबडे, वर्षा राऊत, धनश्री भांडेकर, सतिश अड्डे, वैशाली लोहाटे यांच्यासह समस्त पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली.

### शहरातील टेलिकॉम नगरात घरफोडी
## साडेआठ लाखांची रोख आणि चार तोळे दागिने चोरी

**वर्धा । प्रतिनिधी**

टेलिकॉम नगरात अज्ञात चोरट्यांनी बंद घराला लक्ष्य करत साडेआठ लाख रुपये रोख रक्कम आणि चार तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना मंगळवारी, १७ डिसेंबर रोजी उघड झाली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



म्हसाळा येथील अतुल शेंडे कुटुंबीयांसह १३ डिसेंबर रोजी काकांच्या मयतीच्या कार्यक्रमासाठी बाहेरगावी गेले होते. त्यांचा गैरहजेरीचा फायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाटातील साडेआठ लाख रुपये रोख रक्कम आणि चार तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले.अतुल शेंडे यांनी घरी परतल्यावर चोरीचा प्रकार लक्षात आला. त्यांनी तत्काळ शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली. या गंभीर घटनेची माहिती मिळताच एसडीपीओ प्रमोद मकेश्वर स्वतः घटनास्थळी भेट देऊन तपासाची जबाबदारी सांभाळली व शहर ढाणेदार पराग पोटे प्रकरणाचा तपास करत आहे सध्या पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वर्धा शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेची मागणी
### राष्ट्रीय वीर अशोक सम्राट संघटनेचे निवेदन

**वर्धा । प्रतिनिधी**

राष्ट्रीय वीर अशोक सम्राट संघटनेच्या वतीने आज वर्धा शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, मुख्यमंत्री, तसेच वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्य विभागाला निवेदन सादर करण्यात आले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विक्की सवाई यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.



७ ऑक्टोबर २०२२ पासून वर्धा शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी शासन आणि प्रशासनाकडे वारंवार मागण्या करण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. १२ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक सचिन तडस यांनी आश्वासन दिले होते की जुनी जिल्हा परिषदेची जागा मिळाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठवला जाईल. तथापि, त्या आश्वासनाचा पुनःपरीक्षण करण्यात आले आहे, आणि संघटनेने या आश्वासनाला झूठा ठरवले आहे.

**संघटनेच्या प्रमुख मागण्या**

१. जिल्हा शल्य चिकित्सक सचिन तडस यांच्यावर झूठे आश्वासन दिल्याबद्दल कठोर कायदेशीर कारवाई करावी.

२. जिल्हाधिकारी वर्धा यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेचा प्रस्ताव शासनाकडे का पाठवला नाही, याचे स्पष्ट लिखित उत्तर द्यावे.

संघटनेने शासन आणि प्रशासनाला लवकरात लवकर यावर कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे.

## शिवाजी विद्यालयाच्या कल्याणीने राष्ट्रीय स्पर्धेत मिळवले सुवर्णपदक

**बीड (प्रतिनिधी):** गोवा येथिल पेडियम स्टेडियम येथे पार पडलेल्या ४थ्या राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धे मध्ये बीड च्या श्री शिवाजी विद्यालया तील ६ वी बची खेळाडू कल्याणी चंद्रहास घुगे हिने सुवर्णपदक जिंकले.



तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने गोवा राज्य संघटना अयोजित ४थी राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धा पेडियम इनडोअर हॉल गोवा येथे दिनांक १२ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पार पडली. गोवा सरकारचे क्रीडामंत्री गोविंद गौडे, तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया चे महासचिव ड. आर. डी. मंगेशकर, भारतीय संघटनेचे निरिक्षक संतोष मोहंती (ओडिसा), महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, अयोजन समितीचे सचिव महादेव चव्हाण, महाराष्ट्र संघटनेचे कोषध्यक्ष व्यंकटेश करारा यांच्या प्रमुख उपस्थीतिमध्ये स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यजमान गोवाराज्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश तामिळनाडू, राजस्थान, गुजरात, ओडिसा, मणिपूर आदि राज्यांतिल ८०० खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमध्ये कल्याणी घुगे हिने सुवर्णपदक जिंकुन महाराष्ट्र संघाला विजेतेपद मिळून दिले. या स्पर्धेसाठी कल्याणीला शाळेतील क्रीडा शिक्षक आजिनाथ भोसले, श्रीमती जटाळ, सुधीर कोल्हे, सुजित गिराम, धनंजय मस्के या क्रीडा शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्था सचिव दिनकररावजी कदम, पदाधिकारी ड. जगन्नाथराव औटे, शकुंतलाताई लोळगे, पवनराव चौरे, आसाराम सुर्वे, शितलताई कदम यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उप मुख्याध्यापक राजकुमार कदम, उप मुख्याध्यापक बि.डी. मातकर, पर्यवेक्षक रमेश सुपेकर, पर्यवेक्षक गिरीष चाळक यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वागत केले आहे.

# भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयात विविध अभ्यासक्रम सुरू

## ११ जानेवारी, २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या माध्यमातून संगीत क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता दि.२३ डिसेंबर, २०२४ ते ११ जानेवारी, २०२५ या कालावधीत प्रवेश अर्ज ऑनलाइन स्वरूपात करावे, असे भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ग. ल. तरतरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

अर्ज करण्यासाठी ु.वेर.ारहरीरिहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर किंवा https:// doaonline. Co.in/LDMIC/ या लिंकवर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.संगीत महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमांची गुणवत्ता व उपयुक्तता उत्कृष्ट दर्जाची राखण्यासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या सल्लागार मंडळावरती अध्यक्ष म्हणून उषा मंगेशकर, सदस्य म्हणून सुरेश वाडकर, आदिनाथ मंगेशकर तर मयुरेश पै समन्वयक म्हणून आणि कला संचालनालयाचे संचालक संतोष क्षीरसागर सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत.

महाविद्यालयात शिकवण्यात येणारे अभ्यासक्रम हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय बासरी वादन, तबला वादन , सतार वादन, पियानो/कीबोर्ड प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच संगीत निर्मिती व ध्वनी अभियांत्रिकी प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी २५ प्रवेश क्षमता आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष असून वार्षिक शुल्क ५४०० रुपये इतके आहे. तसेच सलिल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा महिने कालावधीसाठी शनिवार - रविवार या दिवशी भावसंगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे या अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून वीस हजार रुपये प्रवेश शुल्क असणार आहे.

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम तात्पुरत्या स्वरूपात पु. ल.देशपांडे अकादमी रवींद्र नाट्यमंदिर प्रभादेवी मुंबई येथे फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्यात येतील. प्रवेश प्रक्रिया तसेच ऑडिशन बाबत पुढील माहिती www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येणार असल्याने उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.



# 'रेडिओ नगर ९०.४' दिवाळी अंक स्पर्धेत 'विनर्स' प्रथम

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

स्नेहालय रेडिओ नगर ९०.४ एफएम आयोजित उत्कृष्ट दिवाळी अंकांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत 'विनर्स'ने प्रथम क्रमांक पटकावला. दुसरा क्रमांक 'तेजोमय'ला, तर तिसरा क्रमांक 'कालनिर्णय'ला मिळाला. 'गावगाथा आणि 'द इनसाईट' या दिवाळी अंकांची उत्तेजनार्थ म्हणून, तर विशेष पारितोषिकासाठी 'जागर' हा हस्तलिखीत दिवाळी अंक आणि 'आनंदघन'ची निवड झाली.

प्रथम क्रमांक ३००० , द्वितीय क्रमांक २००० आणि तृतीय क्रमांक १००० रुपये, तसेच गौरवचिन्ह आणि प्रशस्तिपत्र असं बक्षिसाचं स्वरूप आहे. सहभागी सर्व दिवाळी अंकांना प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेचे परीक्षण पल्लवी गुजराथी आणि अंजली देशमुख यांनी केले. 'विनर्स हा जगातील पहिला 'एआय' लिखित दिवाळी अंक असून




त्याचे संपादक विनोद शिंदे व सुनील निकम (पुणे) आहेत. 'तेजोमय' दिवाळी अंक पुणे डॉक्टर्स असोसिएशनतर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. 'कालनिर्णय' अंकाचे संपादन जयराज साळगावकर (मुंबई) यांनी केले आहे. पारितोषिक वितरणाची तारिख लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी माहिती स्टेशन हेड संदीप क्षीरसागर यांनी दिली

# वर्ष २०१७ ते २०२० पर्यंतच्या तीन आर्थिक वर्षातील वस्तू व सेवा करमागण्यांशी संबंधीत व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्याची अभय योजना लागू ; ३० मार्च अंतिम मुदत

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ विधेयकातील कलम ७३ अंतर्गत वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० च्या करमागण्यांशी संबंधित व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्याची अभय योजना (-पशीीं डलहशाश) राज्यात लागू करण्यात आली असून ३१ मार्च २०२५ ही देय कर रकमेचा भरणा करण्याची अंतिम तारीख आहे. त्यापूर्वी देय रकमेचा भरणा केल्यास त्यावरील सर्व व्याज व दंड माफ होणार असल्याने संबंधित व्यापाऱ्यांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केले.

या अभय योजनेसंदर्भात अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, राज्य प्राधिकरणाच्या अखत्यारीतील करदात्यांकडून साधारण एक लाख चौदा हजार अर्ज अपेक्षित आहेत. विवादित रक्कम ५४ हजार कोटी रुपयांची आहे. त्यापैकी विवादीत कर २७ हजार कोटी रुपयांचा त च दंड व शास्तीची रक्कम २७ हजार कोटी रुपयांची आहे. यापूर्वीचा अनुभव विचारात घेता विवादीत कराच्या सुमारे २० टक्के रक्कम योजनेमध्ये जमा होते. त्यानुसार या योजनेमध्ये सुमारे ५ हजार ५०० कोटी ते ६ हजार कोटी रुपये विवादीत कर रक्कम जमा होणे अपेक्षित आहे. यापैकी अर्धी रक्कम म्हणजे २ हजार ७०० कोटी ते ३ हजार कोटी रुपये राज्य शासनास मिळतील व उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडे जमा होईल. या योजनेमुळे व्यापाऱ्यांना सुमारे ५ हजार५०० ते ६ हजार कोटी रुपयांच्या व्याज व दंडातून दिलासा मिळेल. या अभय योजनेची माहिती करदात्यांना, वकीलांना, चार्टर्ड अकाऊंटंट, नागरिकांना होण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात सांगितले.

## अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडविण्याबाबत

# प्रशासनाची सकारात्मक भूमिका जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक समाजाच्या समस्यांविषयी शासन सकारात्मक असून त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, बाळासाहेब कोळेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, महानगरपालिका उपायुक्त प्रियंका शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, अल्पसंख्याक समाज प्रतिनिधी यश शहा, हरजितसिंग देवेंद्रसिंग वधवा, सय्यद वहाब व सय्यद अफजल अब्दुल कादर आदी उपस्थित होते.

जिल्हा अल्पसंख्यांक समितीची दर तीन महिन्यांतल्या पहिल्या मंगळवारी बैठक



आयोजित करण्यात यावी अशी सूचना करीत जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितीत अल्पसंख्याक प्रतिनिधींकडून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. अल्पसंख्याक समाजाच्यावतीने उपस्थित प्रतिनिधींनी अल्पसंख्यांक समाजाच्या विविध मागण्या व समस्यांबाबत मते मांडली.बैठकीला अल्पसंख्यांक विभागाच्या योजना राबविणाऱ्या विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# चेंबूर नाक्यावरील पालिका मंडईच्या पुनर्विकासामध्ये दुकानदार वाऱ्यावर

**मुंबई । प्रतिनिधी**

चेंबूर नाक्यावरील महापालिकेच्या भाऊराव हरिश्चंद्र चेंबूरकर मंडईची इमारत पुनर्विकास करण्यासाठी पाडण्यात आली आहे.मात्र तब्बल दोन वर्षे उलटत आली तरी या इमारत कामाची एक विटही रचली गेली नसल्याने या इमारतीतील शेकडो दुकानदार,गाळेधारक अक्षरशः वार्यावर आहेत. विशेष म्हणजे पालिकेने या कामाचा गोपनीय आराखडा बनवुन दुकानदारांची फसवणूक केली असल्याचा आरोप चेंबूर नाका व्यापारी असोसिएशन मच्छी मार्केटने केला आहे. चेंबूर नाक्यावरील पालिकेच्या या मंडईची इमारत सुमारे दोन वर्षांपूर्वी पुनर्विकासाच्या नावाखाली पाडण्यात आली.त्यावेळी या मंडईतील दुकानदार, भाजीपाला विक्रेते गाळेधारक,मच्छी- मटन विक्रेते यांना पसंतीचा आराखडा दाखवून त्यांना इमारतीतून बाहेर काढले. त्यावेळी त्यांचे कुर्ला परिसरात पण अडचणीच्या ठिकाणी तात्पुरते पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव पालिकेने तयार केला होता.या



प्रस्तावाला दुकानदारांनी नकार दिल्याने हा प्रस्ताव बाळगला.तेव्हापासुन हे दुकानदार वार्यावर आहेत केवळ मच्छी- मटन विक्रेत्यांना सध्याच्या ठिकाणी बाजूलाच मोकळ्या जागेत तात्पुरती जागा दिली आहे.पण तिथेही त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत.या मंडईची नवीन इमारत सहा मजल्याची बनवणार असून ४ ते ६ मजले चक्क पार्किंगसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या मंडईतील ८० किराणा दुकानदारांना त्याच इमारतीत पण स्वतंत्र जागा देण्यात आली आहे. स्वतंत्र जागा दिल्याने त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होण्याची भीती हे दुकानदार व्यक्त करीत आहेत.या नवीन मंडई इमारतीच्या बांधकामाचा आराखडा बदलला असून त्यामध्ये आमची पालिकेने फसवणूक केली असल्याचा आरोपही या दुकानदारांनी केला आहे.तरी पालिकेने आम्हाला दुकानदार, गाळेधारकांना विश्वासात घेऊन नवीन आराखडा बनवुन या मंडई इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करावे,अशी मागणी येथील व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# हदगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कैलाश बळवंत

## जनसामान्यांसाठी कार्यरत नेतृत्व

**नांदेड (बालाजी पाटिल)**

हदगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कैलाश बळवंत यांनी आपल्या उत्तम कामगिरीने तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी आणि गोरगरीब जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत.

शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे कार्य तालुक्यात कौतुकाचा विषय ठरले आहे.बळवंत साहेबांनी घरकुल, विहीर, ठिबक सिंचन, पाईपलाइन यासह अनेक योजना शेतकरी आणि गरजूंपर्यंत पोहोचवल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील योजनांच्या अंमलबजावणीत वेग आला असून, याचा फायदा गरीब व कष्टकरी वर्गाला होत आहे.

हदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. पाणी टंचाई असो किंवा घरकुल योजना -



प्रत्येक समस्येवर तोडगा काढण्यासाठी त्यांनी प्रशासन व लोकांमध्ये समन्वय साधला आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे.कैलाश बळवंत यांची कामगिरी पाहता, हदगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर आणि विश्वास आहे. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे ग्रामविकासाच्या दिशेने तालुक्यात सकारात्मक बदल घडत आहेत. अनेक लाभार्थ्यांनी त्यांच्याबद्दल समाधान व्यक्त केले असून, त्यांनी हदगाव तालुक्याला एक नवा आदर्श दिला आहे.कैलाश बळवंत साहेबांचे कार्य केवळ शासकीय योजनांपुरते मर्यादित नाही, तर त्यांनी लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली हदगाव तालुका विकासाच्या मार्गावर वाटचाल करत असून, त्यांच्या कामगिरीचे अनुकरण इतर गटविकास अधिकाऱ्यांनी करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून गरीब, शेतकरी, व कष्टकरी यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य कैलाश बळवंत साहेबांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या या योगदानामुळे हदगाव तालुका एक प्रगतशील तालुका म्हणून नावारूपाला येत आहे.

# अल्ट्राकेअर हॉस्पिटल येथे सर्वांसाठी मोफत सर्व रोग निदान शिबीर संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जीवनज्योत मेडिकल फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट चे चेअरमन डॉ. रियाज व माजी नगरसेवक शेख मुदसर अहमद इसहाक यांच्या संयुक्त विद्यमाने डिएसपी चौक टॉप-अप पेट्रोल पंपासमोर फकीरवाडा येथे अल्ट्राकेअर हॉस्पिटल मोफत सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन कसरण्यात आले होते.

या शिबिरात हृदयरोग, बालरोग, स्त्रीरोग, मधुमेह, पाठ मान, गुडघे, कान, नाक, घसा, पोट आदी विकार आजारांची सुमारे ३०० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली तसेच थायरॉईड, उच्च रक्तदाब, मधुमेह, लिव्हर विकार काविळ, फुसाचे विकार दमा, निमोनिया, संसर्गजन्य आजार डेंग्यु मलेरीया, एच.आय.व्ही, किडनीची टेस्ट, कॅन्सरचे टेस्ट, सिरम कॅल्शियम, शुगर, हिमोग्लोबीन आदीची तपासणी संपूर्ण सुरक्षा केंद्र, जिल्हा रुग्णालय अ.नगर यांच्यामार्फत मोफत करण्यात आली असुन यावेळी शिबिरास डॉ. श्रीतेज जेजुरकर, डॉ. संतोष गिते, डॉ. सुनील पोखरा, डॉ. गणेश मिसाळ, डॉ प्रियंका गायकवाड, डॉ.



रियाज शेख, डॉ. अहद शेख, डॉ प्रणिन गायकवाड, डॉ.सुरेंद्र पिंपरकर, डॉ.आलिया शेख, डॉ.हसीना मुदस्सर शेख आदी तज्ञ डॉ. उपस्थिती होते.

या शिबिराचे आयोजन करण्यासाठी अर्पिता दाते, हिना शेख, आरबाज शेख, विनय इथे, सागर फुलारी, दीपक चौरे, आदित्य करपे, अतिफ शेख, हाजी एजाज, फारुख शेख, गौरव डाके आदींनी परिश्रम घेतले.